# जिल्हा परिषद, जळगाव

## जिल्हा परिषद जळगाव यांनी राबविलेले नाविन्यपूर्ण उपक्रम

**श्रीमती मिनल करनवाल**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

# मिशन संजीवनी

जळगाव जिल्ह्यातील वाढते तापमान, पर्यायाने पर्यावरणात होणारे बदल, वाढते कॉंक्रिटीकरण यामुळे दिवसेंदिवस भूजल पातळीत मोठ्या प्रमाणावर घट दिसत आहे. भूजल पातळीत झपाट्याने होणारी घट हा चिंतेचा विषय बनला असून होणारी घट भरून काढण्यासाठी जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीनल करनवाल यांच्या संकल्पनेतून जळगाव जिल्हा परिषद" मिशन संजीवनी" हे अभियान राबवणार आहे. यापुढे जळगाव जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या प्रत्येक मंजुरी आदेशात " रेन वॉटर हार्वेस्टिंग" करणे हा विषय सक्तीचा करण्यात येणार आहे.

जळगाव जिल्ह्यात दरवर्षी उन्हाळ्यात तापमान मोठ्या प्रमाणावर असते वाढते तापमान, दिवसेंदिवस होणारे कॉंक्रिटीकरण, पाण्याचा अतिरिक्त होणारा वापर यामुळे दिवसेंदिवस भूजल पातळी मोठ्या प्रमाणावर घटत आहे जळगाव जिल्ह्यात देखील दरवर्षी उन्हाळ्यात भूजल पातळीत मोठ्या प्रमाणात घट होत असल्याने जिल्ह्यात अनेक ठिकाणी पाणी टंचाई सारख्या भिषण समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागते. जिल्ह्यातील अनेक भागात टॅंकरने पाणीपुरवठा करावा लागतो अनेक ठिकाणी विहिरी अधिकृत करून देखील पाण्याची मोठी समस्या जाणवते यावर मात करण्यासाठी जळगाव जिल्हा परिषदेने "मिशन संजीवनी" अभिनव संकल्पना सुरू केली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती करनवाल यांच्या अभिनव संकल्पनेतून" मिशन संजीवनी"ची मुहूर्तमेढ झाली आहे.

जिल्हा परिषद अंतर्गत विविध विभागांकडून ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्र, आरोग्य उपकेंद्र, शाळा इमारत खोली बांधकाम, समाज मंदिरांचे तसेच ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम, सभागृह, सभा मंडप यासारखे विविध बांधकाम करण्यात येतात. यासारख्या कामांना मंजुरी देताना किंवा प्रशासकीय मान्यता देताना सदर मंजुरी आदेशात संबंधित इमारतीचे बांधकाम करण्याचा मक्ता जो मक्तेदार घेईल त्यांना शतावर पावसाळ्यात पडणाऱ्या पाण्याचे पुनर्भरण (रेन वॉटर हार्वेस्टिंग) करण्याचे काम स्वखर्चाने करून देणे बंधनकारक राहणार आहे.

मार्च 2025 पासून नव्याने मान्यता देण्यात आलेल्या **400** कामांना रेन वॉटर हार्वेस्टिंग बंधनकारक करण्यात आले आहे

400 कामांना रेन वॉटर हार्वेस्टिंग बंधनकारक



## रेन वॉटर हार्वेस्टींग जि.प.ने केले बंधनकारक

**जिल्ह्यातील वाढते तापमान, पर्यायाने पर्यावरणात होणारे बदल, वाढते कॉंक्रिटीकरण यामुळे दिवसेंदिवस भूजल पातळीत मोठ्या प्रमाणावर घट दिसत आहे. भूजल पातळीत झपाट्याने होणारी घट हा चितेचा विषय बनला असून होणारी घट भरून काढण्यासाठी जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीनल करनवाल यांच्या संकल्पनेतून जळगाव जिल्हा परिषद मिशन संजीवनी हे अभियान राबवणार आहे.**

**जळगाव, (वा.)** यापुढे जळगाव जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागामार्फत दिल्या जाणाऱ्या प्रत्येक मंजुरी आदेशात रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे हा विषय सक्तीचा करण्यात येणार आहे.

जळगाव जिल्ह्यात दरवर्षी उन्हाळ्यात तापमान मोठ्या प्रमाणावर असते वाढते तापमान, दिवसेंदिवस होणारे कॉंक्रिटीकरण, पाण्याचा अतिरिक्त होणारा वापर यामुळे दिवसेंदिवस भूजल पातळी मोठ्या प्रमाणावर घटत आहे. जळगाव जिल्ह्यात देखील दरवर्षी उन्हाळ्यात भूजल पातळीत मोठ्या प्रमाणात घट होत असल्याने जिल्ह्यात अनेक ठिकाणी पाणी टंचाई सारख्या भिषण समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागते. जिल्ह्यातील अनेक भागात टॅंकरने पाणीपुरवठा करावा लागतो अनेक ठिकाणी विहिरी अधिकृत करून देखील पाण्याची मोठी समस्या जाणवते यावर मात करण्यासाठी जळगाव जिल्हा परिषदेने मिशन संजीवनी अभिनव संकल्पना अमलात आणण्याचे निश्चित केले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या अभिनव संकल्पनेतून मिशन संजीवनीची मुहूर्त मेढ होणार आहे. या संदर्भातील स्पष्ट बांधकाम मंजुरी आदेशात टाकण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी करनवाल यांनी दिले आहेत. रेन वॉटर हार्वेस्टिंग च्या कामाचा कोणताही अतिरिक्त मोबदला दिला जाणार नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

### कामांची बिलेही निघणार नाहीत

**बांधकामाच्या ठिकाणी मक्तेदाराने रेन वॉटर हार्वेस्टिंग चे काम न केल्यास बांधकाम पूर्णत्वाची नोंद प्रशासकीय दप्तरी घेतली जाणार नसल्याचे स्पष्ट सूचना देखील देण्यात आल्या आहेत. काम पूर्ण झाल्यानंतर इमारतीच्या ठिकाणी रेन वॉटर हार्वेस्टिंग केल्याचे पुरावे**

# जिल्हा परिषद “मालमत्ता शोध मोहीम”

'संपत्ति खोज मुहिम' से खुलेगा वर्षों का लेखाजोखा!

## जलगांव जिप की संपत्तियां अब डिजिटल रिकॉर्ड में

■ **जलगांव,** (सं.) जिला परिषद की करोड़ों रुपये की अचल संपत्तियां अब सिर्फ कागजों में ही नहीं, बल्कि डिजिटल रिकॉर्ड में भी दर्ज होंगी. वर्षों से बिना ठोस रिकॉर्ड के पड़ी जमीन, भवन और अन्य संपत्तियों को लेकर जिला परिषद ने एक बड़ा कदम उठाया है. मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) मीनल करनवाल की पहल पर 'संपत्ति खोज मुहिम' की शुरुआत की गई है, जिसका मकसद इन संपत्तियों का वैज्ञानिक, पारदर्शी और डिजिटल रजिस्ट्रेशन करना है. इस मुहिम के तहत हर ग्राम पंचायत स्तर पर जिला परिषद के स्वामित्व वाली जमीन, स्कूल, आंगनवाड़ी, स्वास्थ्य केंद्र, खाली भूखंड और खेतों की पहचान की जा रही है. टीमों को हर संपत्ति की लोकेशन, दस्तावेज़, उपयोग की स्थिति और वर्तमान हालात का पूरा ब्यौरा तैयार करने का निर्देश दिया गया है.



### करनवाल ने निर्देश दिए

प्रशासनिक सूत्रों के मुताबिक, पहले ऐसी कई संपत्तियां या तो अज्ञात थीं या उन पर अतिक्रमण हो चुका था. अब एक केंद्रीकृत डेटा तैयार करके, इन परिसंपत्तियों को योजना, विकास कार्य और राजस्व स्रोत के रूप में उपयोग में लाने की तैयारी है. सीईओ करनवाल ने साफ निर्देश दिए हैं कि हर तालुका स्तर पर इस काम को समयबद्ध और सटीक तरीके से पूरा किया जाए. यह पहली बार होगा जब जिला परिषद अपनी हर अचल संपत्ति की विस्तृत रिपोर्ट और दस्तावेजीकरण के साथ पूरी तरह तैयार होगी.

**1117 मालमत्तांचा लागला शोध**

जळगांव जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या मालकीच्या विविध स्थावर मालमत्तांचा शोध घेण्यासाठी व मालमत्तेची अचूक नोंद करण्यासाठी जिल्हा परिषदेने एक विशेष “मालमत्ता शोध मोहीम” सुरु केली आहे.

या उपक्रमाची संकल्पना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी मांडली होती.या मोहिमेअंतर्गत संपूर्ण जिल्ह्यातील ग्रामपंचायत स्तरावर जिल्हा परिषद मालकीच्या जमिनी, इमारती, शाळा, अंगणवाड्या, आरोग्य केंद्रे, शेतजमिनी, रिकाम्या जागा व इतर मालमत्तांचा शोध घेऊन संबंधित माहिती एकत्रित केली जात आहे. संकलित माहिती जिल्हा परिषद मुख्यालयात पाठविण्याचे निर्देश सर्व तालुका व गट स्तरावर दिले गेले आहेत.

या मोहिमेमुळे जिल्हा परिषदेच्या मालमत्तेची नेमकी यादी तयार होणार असून, भविष्यातील नियोजन, विकास कामे, संरक्षण व महसूल वाढीच्या दृष्टीने या माहितीचा उपयोग केला जाणार आहे.

या मोहिमेमुळे आतापर्यंत 1117 पेक्षा अधिक जिल्हा परिषद मालकीच्या वर्षानुवर्षापासून दुर्लक्षित व भग्न अवस्थेत असलेल्या मालमत्तांचा शोध लागला आहे.

# जिल्हा परिषद शाळा माजी विद्यार्थी संघ

शालेय शिक्षण विभागाने राज्यातील सर्व जिल्हा परिषद, नगरपालिका, महापालिका, अनुदानित व खासगी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रगतीत सक्रिय सहभाग घेता यावा, शाळेशी भावनिक नाते घट्ट व्हावे आणि सामाजिक बांधिलकी जपली जावी या हेतूने हा निर्णय घेण्यात आला आहे.या निर्णयाची पायाभरणी मात्र जळगाव जिल्हा परिषदेच्या नाविन्यपूर्ण प्रयोगातून झाली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी पदभार स्वीकारल्यानंतर 4 एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित एका कार्यक्रमात जिल्ह्यातील शाळांमध्ये माजी विद्यार्थी संघ राबविण्याची संकल्पना जाहीर केली होती. सध्या जळगाव जिल्ह्यात १६२५ पेक्षा अधिक माजी विद्यार्थी संघ यशस्वीपणे कार्यरत असून, त्यांच्या उपक्रमामुळे शाळांच्या विकासात सकारात्मक बदल दिसून येत आहेत. हाच "जळगाव पॅटर्न" आता शासन अध्यादेशाद्वारे संपूर्ण राज्यात अंमलात आला आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार –माजी विद्यार्थी संघामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष, मुख्याध्यापक/प्राचार्य सचिव म्हणून असतील. एक पालक प्रतिनिधी, निवृत्त अधिकारी व शिक्षक सल्लागार सदस्य म्हणून सहभागी होतील. प्रत्येक शाळेला वर्षातून किमान एकदा माजी विद्यार्थी मेळावा व स्नेहसंमेलन घेणे बंधनकारक असेल.गणेशोत्सव, दसरा, दिवाळी, ईद, ख्रिसमस यांसारख्या सणांच्या पार्श्वभूमीवर हे कार्यक्रम आयोजित केले जातील.या कार्यक्रमांमध्ये माजी विद्यार्थ्यांचा सत्कार, शाळेचा विकास आराखडा, शिक्षक सन्मान व विविध सांस्कृतिक उपक्रम राबविले जातील. तसेच शाळेच्या भौतिक सुविधांच्या उभारणीत माजी विद्यार्थी मार्गदर्शन व सहकार्य करतील.

जळगाव जिल्ह्यातील सोळाशे पंचवीस शाळांमध्ये स्थापन करण्यात आलेल्या माजी विद्यार्थी संघाच्या माध्यमातून आतापर्यंत 8 लक्ष 84 हजार 560 रुपयांची विविध वस्तू रुपी तसेच रोकडे भेटी जिल्हा परिषदेच्या मराठी शाळांना मिळाले आहेत

**8 लक्ष 84 हजार 560 रुपयांच्या विविध वस्तू रुपी तसेच रोकड भेटी प्राप्त**

## जळगावच्या माजी विद्यार्थी संघाच्या पॅटर्नची राज्यभर अंमलबजावणी!

### जि.प.सीईओंनी राबविली सर्व शाळांमध्ये संकल्पना

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** शालेय शिक्षण विभागाने राज्यातील सर्व जिल्हा परिषद, नगरपालिका, महापालिका, अनुदानित व खासगी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये माजी विद्यार्थी संघ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांना शाळेच्या प्रगतीत सक्रिय सहभाग घेता यावा, शाळेशी भावनिक नाते घट्ट व्हावे, सामाजिक बांधिलकी जपली जावी, या हेतूने हा निर्णय घेण्यात आला आहे.

या निर्णयाची पायाभरणी जळगाव जिल्हा परिषदेच्या नावीन्यपूर्ण प्रयोगातून झाली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी पदभार स्वीकारल्यानंतर ४ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित एका कार्यक्रमात जिल्ह्यातील शाळांमध्ये माजी विद्यार्थी संघ राबविण्याची संकल्पना जाहीर केली होती. सध्या जळगाव जिल्ह्यात २० पेक्षा अधिक माजी विद्यार्थी संघ यशस्वीपणे कार्यरत असून, त्यांच्या उपक्रमामुळे शाळांच्या विकासात सकारात्मक बदल दिसून येत आहेत.

१ शालेय शिक्षण विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार - माजी विद्यार्थी संघामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, कोषाध्यक्ष, मुख्याध्यापक/प्राचार्य सचिव म्हणून असतील.

२ एक पालक प्रतिनिधी, निवृत्त अधिकारी व शिक्षक सल्लागार सदस्य म्हणून सहभागी होतील. प्रत्येक शाळेला वर्षातून किमान एकदा माजी विद्यार्थी मेळावा व स्नेहसंमेलन घेणे बंधनकारक असेल. गणेशोत्सव, दसरा, दिवाळी, ईद, ख्रिसमस यासारख्या सणांच्या पार्श्वभूमीवर हे कार्यक्रम आयोजित केले जातील.

३ या कार्यक्रमांमध्ये माजी विद्यार्थ्यांचा सत्कार, शाळेचा विकास आराखडा, शिक्षक सन्मान व विविध सांस्कृतिक उपक्रम राबविले जातील. शाळेच्या भौतिक सुविधांच्या उभारणीत माजी विद्यार्थी मार्गदर्शन व सहकार्य करतील. विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन, शिष्यवृत्ती व प्रेरणा दिली जाईल. पर्यावरणपूरक आणि सामाजिक उपक्रमांना चालना दिली जाईल.

४ राज्य सरकारने यासाठी विशेष ऑनलाइन नोंदणी प्रणाली तयार केली असून, त्यावर प्रत्येक माजी विद्यार्थ्यांची नोंदणी होणार आहे. शाळांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांचे फोटो व अहवाल या पोर्टलवर अपलोड करणे अनिवार्य असणार आहे.

# शैक्षणिक गुणवत्ता वाढीची भरारी

- जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या वाढावी, या शाळांकडे पाहण्याचा समाजाचा पालकांचा दृष्टिकोन सकारात्मक व्हावा, जिल्हा परिषद शाळेतून गुणवत्तापूर्ण विद्यार्थी बाहेर पडावेत, स्पर्धा परीक्षांमध्ये या विद्यार्थ्यांचा टक्का वाढावा, शिष्यवृत्ती आणि नवोदयच्या परीक्षेमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थी गुणवत्ता यादीत यावेत या हेतूने जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या वाढवा आणि बक्षीस मिळवा ही योजना मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी या शैक्षणिक वर्षात राबवण्याचे ठरवले आहे. शुक्रवारी त्यांनी जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकारी यांना
- जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळांची मागील तीन वर्षाची इयत्ता पहिलीची पटसंख्या देऊन त्याचा तुलनात्मक अभ्यास करण्याच्या सूचना केल्या. आणि त्यानुसार यावर्षी या पटसंख्येत किमान २५ टक्के वाढ करण्याचे निर्देश दिले.
- शैक्षणिक गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने निपुण भारत या अभियान अंतर्गत जळगाव जिल्ह्यात मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर स्वतः वैयक्तिक लक्ष घालून गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने विविध योजना अंमलात आणल्या. त्या माध्यमातून जून महिन्यात निपुण भारत अंतर्गत जिल्हास्तरीवर्ती सरासरी 38 टक्के इतकी होती ती टक्केवारी आता सप्टेंबर अखेर 76.07 इतकी झाली आहे



शिक्षा विभाग की समीक्षा बैठक में लिए गए कई अहम फैसले

## मीनल ने शिक्षा गुणवत्ता की कमान संभाली


■ जलगांव, (सं.) जिले में स्कूली शिक्षा की गुणवत्ता, पारदर्शिता और समावेशी विकास को लेकर आयोजित समीक्षा बैठक में जिला परिषद की मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल केंद्रबिंदु बनकर उभरीं. जिलाधिकारी आयुष प्रसाद की अध्यक्षता में हुई इस बैठक में मीनल करनवाल ने विभागीय प्रगति का सविस्तर लेखाजोखा प्रस्तुत करते हुए शैक्षणिक व्यवस्थाओं में सुधार के लिए कई महत्वपूर्ण दिशा-निर्देश दिए. बैठक में सीईओ करनवाल ने विशेष रूप से उन विद्यालयों की पहचान पर जोर दिया जो लगातार कमजोर प्रदर्शन कर रहे हैं. उन्होंने स्पष्ट कहा कि परिणाम सिर्फ आंकड़े नहीं, बल्कि शिक्षण प्रक्रिया की कसौटी हैं. उन्होंने अधोप्रदर्शन करने वाले विद्यालयों के लिए विशेष सहायता पैकेज की घोषणा का प्रस्ताव भी रखा, जिससे वहां शिक्षण की गुणवत्ता में सुधार लाया जा सके.

### 'घर-घर सर्वेक्षण' का नया मॉडल

मूलभूत शिक्षा से वंचित बच्चों की शिनाख्त के लिए मीनल करनवाल ने "घर से घर तक" सर्वेक्षण का प्रस्ताव रखा, जिसके तहत प्रत्येक गांव व बस्ती में शाला बाह्य बच्चों की पहचान कर उन्हें मुख्यधारा से जोड़ा जाएगा. इस पहल को आनेवाले मानसून सीजन से पहले प्रारंभ करने की योजना है. बैठक में यह भी तय हुआ कि हर छात्र की शिक्षण स्तर की जांच स्कूल में प्रवेश के समय की जाएगी. मीनल करनवाल ने कहा कि भाषा व गणित की पकड़ मजबूत करने के लिए ब्रिज कोर्स सभी स्कूलों में अनिवार्य किया जाए. उन्होंने शैक्षणिक डेटा प्रविष्टि के लिए UDISE प्रणाली को सशक्त रूप से लागू करने पर बल दिया.

### प्रशासनिक समन्वय और पारदर्शिता पर जोर

उन्होंने निर्देश दिया कि स्कूल स्तर पर ही शिविर लगाकर यह प्रमाणपत्र वितरित किए जाएं ताकि विद्यार्थियों और अभिभावकों को अनावश्यक चक्कर न काटने पड़ें. सीईओ करनवाल ने कहा कि जो विद्यालय प्रवेश संख्या बढ़ाने में सफल हुए हैं, उन्हें स्वतंत्रता दिवस पर सम्मानित किया जाएगा, जिससे अन्य विद्यालयों को भी प्रेरणा मिले. मीनल करनवाल का साफ कहना था कि शिक्षा योजनाएं केवल कागजों पर नहीं, जमीन पर दिखनी चाहिए. हर बच्चा स्कूल में और हर स्कूल उत्कृष्टता की ओर बढ़े, यही हमारी प्राथमिकता होनी चाहिए. बैठक में DIET प्राचार्य, माध्यमिक व प्राथमिक शिक्षाधिकारी, और शिक्षा विभाग के अन्य वरिष्ठ अधिकारी मौजूद थे. सभी ने मीनल करनवाल की पहल को सकारात्मक रूप में स्वीकारते हुए समन्वयात्मक कार्य करने का आश्वासन दिया.



# जिल्हा परिषद आपल्या दारी



महिन्यातून दोन वेळा

## जिल्हा परिषद जाणार तालुक्यावर!

**लक्षवेधी... सीईओ मिनल करणवाल यांची तक्रार निवारणदिनी संकल्पना**

- फेऱ्यांपासून मुक्ती
- समस्यांचे निराकरण
- अभिनव योजना
- सर्वसामान्यांना दिलासा

जळगाव । प्रतिनिधी

वर्षानुवर्षे साचलेल्या त्याच त्या तक्रारी जिल्हा परिषदेची संबंधित असलेल्या कार्यालया अंतर्गत येणाऱ्या विविध शाखा कार्यालयांना नागरिक व कर्मचारी यांना वारंवार माराव्या लागणाऱ्या फेऱ्या यापासून आता संबंधित कार्यालय व नागरिक तसेच कर्मचाऱ्यांना मुक्ती मिळणार आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या अभिनव संकल्पनेतून दर महिन्यातून दोन वेळा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह सर्व विभाग प्रमुख यांच्या समवेत तालुका स्तरावर तक्रार निवारण दिन घेण्यात येणार आहे. यातून सर्व प्रकारच्या तक्रारी चे जागच्या जागी निराकरण करण्यात येणार आहे. या अभिनव योजनेमुळे एक प्रकारे प्रशासन आपल्या दारी याचा प्रत्यय नागरिकांना येणार आहे.

शासकीय कार्यालय म्हटले की वर्षानुवर्षाच्या प्रलंबित तक्रारी विविध प्रकारच्या निर्णयाच्या फायलींसाठी माराव्या लागणाऱ्या चकरा त्यातून होणारा मनस्ताप असा अनुभव कित्येकदा सामान्य नागरिकांसह कर्मचाऱ्यांना येत असतो. नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावरून जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर नव्यानेच हजर झालेल्या मिनल करनवाल यांनी हजर झाल्यानंतर सुरुवातीच्या काळातच संबंधित विभागांचा आढावा घेऊन वर्षानुवर्षाच्या साचलेल्या तक्रारींचे निराकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. यातूनच त्यांनी तालुकास्तरावर महिन्यातून दोन वेळा तक्रार निवारण दिन घेण्याचा व प्राप्त तक्रारींचा जागच्या जागी निपटारा करण्याचा निश्चय केला आहे.

**दुसऱ्या व चौथ्या मंगळवारी नियोजन**

प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या मंगळवारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह जिल्हा परिषदेचे सर्व विभाग प्रमुख तालुकास्तरावर जाणार असून तालुकास्तरावर तक्रार निवारण दिन घेणार आहेत.या तक्रार निवारण दिनात प्राप्त होणाऱ्या विविध प्रकारच्या प्रशासकीय तक्रारींवर साधक बाधक चर्चा करून त्या तक्रारींचे जागच्या जागी निराकरण करण्यात येणार आहे. यामुळे अनेक दिवस साच पाऱ्या तक्रारी, विविध प्रकारच्या समस्या या अत्यंत जलद पद्धतीने वेळच्यावेळी सोडवल्या जाणार आहेत. अत्यंत अभिनव उपक्रमाच्या माध्यमातून सामान्य नागरिक तसेच कर्मचाऱ्यांना विविध तक्रारींपासून तसेच वारंवार शासकीय कार्यालयात माराव्या लागणाऱ्या चकरा पासून मुक्ती मिळणार आहे. या उपक्रमामुळे प्रशासन आपल्या दारी सारख्या योजनेचा अनुभव नागरिकांना येता येणार आहे.

**घरकुलांचे भूमिपूजन**

प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत टप्पा दोन मध्ये आज जिल्हाभरात ३४ हजार ४२३ घरकुलांचे भूमीपूजन करण्यात आले. जिल्ह्याला ८६६८९ इतके घरकुल मंजूर करण्यात आलेले होते.यापैकी प्रथम हप्ता ७१ हजार ६४५ लोकांना वितरित करण्यात आलेला होता यामध्ये जळगाव जिल्ह्यात दिनांक ४ मार्च २०२५ एकाच वेळी प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन मध्ये घरकुल सुरू करण्याकरिता मोहीम राबवण्यात आलेली होती या मोहिमेंतर्गत ३५२६४ इतकी घरकुल सुरू करण्यात आलेले होते. मोहीम स्वरूपात गुरुवारी ३५४२३ इतके घरकुलांचे भूमिपूजन करण्यात आले.




**11 तालुक्यात 1600 पेक्षा अधिक प्राप्त तक्रारींचे निराकरण**

वर्षानुवर्षे साचलेल्या त्याच त्या तक्रारी जिल्हा परिषदेची संबंधित असलेल्या कार्यालया अंतर्गत येणाऱ्या विविध शाखा कार्यालयांना नागरिक व कर्मचारी यांना वारवार माराव्या लागणाऱ्या फेऱ्या यापासून आता संबंधित कार्यालय व नागरिक तसेच कर्मचाऱ्यांना मुक्ती मिळणार आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल याच्या अभिनव संकल्पनेतून दर महिन्यातून दोन वेळा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह सर्व विभाग प्रमुख यांच्या समवेत तालुका स्तरावर तक्रार निवारण दिन घेण्यात येणार आहे. यातून सर्व प्रकारच्या तक्रारी चे जागच्या जागी निराकरण करण्यात येणार आहे. या अभिनव योजनेमुळे एक प्रकारे प्रशासन आपल्या दारी याचा प्रत्यय नागरिकांना येणार आहे.शासकीय कार्यालय म्हटले की वर्षानुवर्षाच्या प्रलंबित तक्रारी विविध प्रकारच्या निर्णयाच्या फायलींसाठी माराव्या लागणाऱ्या चकरा त्यातून होणारा मनस्ताप असा अनुभव कित्येकदा सामान्य नागरिकांसह कर्मचाऱ्यांना येत असतो.

मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी हजर झाल्यानंतर सुरुवातीच्या काळातच संबंधित विभागांचा आढावा घेऊन वर्षानुवर्षाच्या साचलेल्या तक्रारींचे निराकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. यातूनच त्यांनी तालुकास्तरावर महिन्यातून दोन वेळा तक्रार निवारण दिन घेण्याचा व प्राप्त तक्रारींचा जागेच्या जागी निपटारा करण्याचा निश्चय केला. त्या अनुषंगाने प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या मंगळवारी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह जिल्हा परिषदेचे सर्व विभाग प्रमुख तालुकास्तरावर जात आहेत. तालुकास्तरावर तक्रार निवारण दिन घेण्यात येतो. या तक्रार निवारण दिनात प्राप्त होणाऱ्या विविध प्रकारच्या प्रशासकीय तक्रारींवर साधक बाधक चर्चा करून त्या तक्रारींचे जागच्या जागी निराकरण करण्यात येते.

या उपक्रमामुळे नागरिकांच्या वर्षानुवर्षापासूनच्या तक्रारींचे निराकरण होणे सुलभ झाले असून याचा परिणाम म्हणून आज पर्यंत जिल्ह्यातील 11 तालुक्यात 1600 पेक्षा अधिक प्राप्त तक्रारींचे निराकरण करण्यात यश मिळाले आहे.

# प्रशासकीय गतिमानतेसाठी आस्थापनांचे बळकटीकरण

**१५० पेक्षा अधिक आस्थापनांना भेटी**



## जि. प.च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून अस्थापनांना भेटीचा धडाका

● प्राथमिक आरोग्य केंद्रात अस्वच्छता आढळल्याने सफाई कर्मचाऱ्याचे वेतन रोखले

**जळगाव** : जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करनवाल यांनी जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या जिल्हा भरातील विविध आस्थापनांना भेटी देण्याचा धडाका सुरू केला असून बुधवार दि.१६ एप्रिल रोजी जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामपंचायतीना भेट दिली असता, प्राथमिक आरोग्य केंद्रात आढळून आलेल्या अस्वच्छता प्रकरणी तेथील सफाई कामगाराचे एका दिवसाचे वेतन रोखण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करनवाल यांनी दिले आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती करनवाल यांनी जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा पदभार स्वीकारल्यानंतर जिल्हाभरातील जिल्हा परिषदेच्या अधीनस्त आस्थापनाना भेटी देण्याचा धडाका सुरू केला आहे. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा,ग्रामपंचायती तसेच ग्रामीण भागात सुरू असलेल्या घरकूल बांधकामाना भेटी देऊन पाहणी करण्यात येत आहे.मंगळवार दि.१५ रोजी भुसावळ तालुक्यातील साकरी आणि किन्ही येथे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भेट देऊन पाहणी केली होती.तर बुधवारी मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती करनवाल यांनी पाचोरा तालुक्यातील वरखेडी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे भेट देऊन तेथील औषध साठा, रुग्णांवर करण्यात येत असलेले उपचार,तेथील स्वच्छता या बाबत पाहणी केली असता, वरखेडी प्राथमिक आरोग्य केंद्र व परिसरात अस्वच्छता आढळून आल्याने तेथील सफाई कामगार यांना जाब विचारत सफाई कामगार यांचे एक दिवसाचे वेतन थांबविण्याचे आदेश दिले.

**घरकुलांना भेट देत केली पाहणी**

या सोबतच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पिंपळगाव हरेश्वर येथे सुरू असलेल्या घरकुल बांधकामे या सोबतच ग्रामपंचायत कार्यालयास भेट देऊन पाहणी केली .त्या सोबतच शिंदाड येथे देखील ग्रामपंचायत कार्यालय व बांधकामे सुरु असलेल्या घरकुलाना भेट देऊन कामाची पाहणी केली व बांधकामाचे काम दर्जेदार करण्याबाबत सूचना दिल्या .यावेळी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक आर.एस.लोखंडे उपस्थित होते.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करनवाल यांनी जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या जिल्हा भरातील विविध आस्थापनांना भेटी देण्याचा धडाका सुरू केला असून बुधवार दि.१६ एप्रिल रोजी जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामपंचायतीना भेट दिली असता प्राथमिक आरोग्य केंद्रात आढळून आलेल्या अस्वच्छता प्रकरणी तेथील सफाई कामगाराचे एका दिवसाचे वेतन रोखण्याचे आदेश दिले आहेत. आतापर्यंत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १५० पेक्षा अधिक आस्थापनांना भेटी दिल्या आहेत

त्याचबरोबर आतापर्यंत जिल्हा परिषद मुख्यालयासह प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामपंचायत,पंचायत समितींना दिलेल्या भेटीदरम्यान आढळून आलेल्या अनियमितता, अस्वच्छता इत्यादी पार्श्वभूमीवर अनेक कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात येऊन बऱ्याच ठिकाणी आवश्यकतेनुसार कार्यवाही देखील करण्यात आले आहे.

मंगळवार दि.१५ रोजी भुसावळ तालुक्यातील साकरी आणि किन्ही येथे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी भेट देऊन पाहणी केली होती.तर बुधवारी श्रीमती करनवाल यांनी पाचोरा तालुक्यातील वरखेडी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे भेट देऊन तेथील औषध साठा,रुग्णांवर करण्यात येत असलेले उपचार,तेथील स्वच्छता या बाबत पाहणी केली असता वरखेडी प्राथमिक आरोग्य केंद्र व परिसरात अस्वच्छता आढळून आल्याने तेथील सफाई कामगार यांना जाब विचारत सफाई कामगार यांचे एक दिवसाचे वेतन थांबविण्याचे आदेश दिले.

या सोबतच मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी पिंपळगाव हरेश्वर येथे सुरू असलेल्या घरकुल बांधकामे या सोबतच ग्रामपंचायत कार्यालयास भेट देऊन पाहणी केली.त्या सोबतच शिंदाड येथे देखील ग्रामपंचायत कार्यालय व बांधकामे सुरु असलेल्या घरकुलाना भेट देऊन कामाची पाहणी केली व बांधकामाचे काम दर्जेदार करण्याबाबत सूचना दिल्या.

# प्रोत्साहनपर अर्ध शासकीय पत्र

## Officers to get rewards

Vijay Pathak
JALGAON

To promote efficiency and innovation within the administration, Jalgaon Zilla Parishad (ZP) Chief Executive Officer Minal Karanwal has launched a monthly initiative to reward outstanding officers with semi-official letters of encouragement.

Since taking charge on Mar 20, Karanwal has introduced a series of innovative reforms aimed at improving governance and the delivery of services. As part of this, ZP department heads and Group Development Officers (GDOs) demonstrating exemplary commitment—such as timely execution of tasks, overcoming administrative hurdles, and ensuring benefits reach citizens—will be selected and recognised each month.

For April, Padmanabh Mhaske, Chief Agricultural Development Officer, and Sachin Panzhade, GDO of Bhusawal, have been chosen. Karanwal said Mhaske was selected for submitting and securing approval of a proposal on a government holiday, while Panzhade was recognised for expediting the construction of homes under the Gharkul housing scheme.

Karanwal emphasised that such public recognition would foster accountability and motivate officers to deliver timely, people-centric governance.

जिल्हा परिषदेच्या गटविकास विभागप्रमुख व अधिकारी यांना प्रशासकीय काम करताना प्रोत्साहन मिळावे. चांगले काम केल्याबद्दल त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मिळावी या दृष्टीने महिनाभरात विविध विषयांबाबत उत्तम काम करणाऱ्या विभागप्रमुख व गटविकास अधिकारी यांना प्रोत्साहनपर अर्ध शासकीय पत्र देण्याची घोषणा जि.प. सीईओ मिनल करनवाल यांनी केली आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांची नांदेड जिल्हा परिषद येथून जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर बदली झाल्यानंतर श्रीमती करनवाल यांनी दि.२० मार्च रोजी पदभार स्वीकारल्यानंतर विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. तसेच राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी देखील करण्यात येत आहे. प्रशासकीय काम करताना येणाऱ्या अडचणींवर मात करून विहित कालावधीत ठरलेली कामे पर्ण करून त्या

बाबींचा लाभ सामान्य घटकापर्यंत पोहचविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणा-या जिल्हा परिषदेच्या विभागप्रमुख, गटविकास अधिकारी यांची दर महिन्याला निवड करून त्यांचे पाठीवर कौतुकाची थाप देण्याच्या दृष्टीने दर महिन्याला अर्ध शासकीय प्रोत्साहनपर पत्र देण्याचा अभिनव उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

## स्नेहा पवार, श्रीकृष्ण इंगळे यांना कौतुकाची थाप

जळगाव : जिल्हा परिषदेच्या विभागप्रमुख व गटविकास अधिकारी यांना प्रशासकीय काम करताना प्रोत्साहन मिळावे. चांगले काम केल्याबद्दल त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मिळावी या दृष्टीने महिनाभरात विविध विषयांबाबत उत्तम काम करणाऱ्या विभागप्रमुख व गटविकास अधिकारी यांना प्रोत्साहनपर अर्ध शासकीय पत्र देण्याची घोषणा जि.प.सीईओ मिनल करनवाल यांनी केली आहे. यात उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा पवार, जामनेर गटविकास अधिकारी श्रीकृष्ण इंगळे यांची निवड कण्यात आली.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांची नांदेड जिल्हा परिषद येथून जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर बदली झाल्यानंतर श्रीमती करनवाल यांनी दि.२० मार्च रोजी पदभार स्वीकारल्यानंतर विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा मनोदय व्यक्त केला आहे. तसेच राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी देखील करण्यात येत आहे. प्रशासकीय काम करताना येणाऱ्या अडचणींवर मात करून विहित कालावधीत ठरलेली कामे पर्ण करून त्या



बाबींचा लाभ सामान्य घटकापर्यं पोहचविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणा जिल्हा परिषदेच्या विभागप्रमुख गटविकास अधिकारी यांची महिन्याला निवड करून त्यांच पाठीवर कौतुकाची थाप देण्याच दृष्टीने दर महिन्याला अर्ध शासकी प्रोत्साहनपर पत्र देण्यात अभिन उपक्रम हाती घेण्यात आला आ या उपक्रमांतर्गत एप्रिल महिन्यासा जिल्हा परिषदेचे एक विभागप्रमु व एक गटविकास अधिकारी यां यासाठी निवड करण्यात आल आहे. मे महिन्यासाठी सामा प्रशासन विभागाच्या उप मुख कार्यकारी अधिकारी स्नेहा पव व जामनेर येथील गटविका अधिकारी श्री कृष्ण इंगळे यां निवड करण्यात आली आ स्नेहा पवार यांना पारदर्शक बद्द प्रक्रिया राबविल्याबद्दल तर जाम गट विकास अधिकारी यांना घरकु योजनेच्या अंमलबजावणीत केलेल कामगिरी बद्दल निवड करण्या आली आहे

या उपक्रमांतर्गत आतापर्यंत जिल्हा परिषदेच्या विविध विभागात काम करणाऱ्या 12 विभाग प्रमुखांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीत्या अर्ध शासकीय पत्र देऊन गौरविण्यात आले आहे

**४ महिन्यात १२ विभाग प्रमुखांचा गौरव**

# उल्लेखनीय पदोन्नती प्रक्रिया पदोन्नती

जिल्हा परिषद जळगाव अंतर्गत कार्यरत विविध संवर्गातील एकूण 207 कर्मचारी यांना, मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करनवाल यांनी मार्च 2025 मध्ये कार्यभार स्वीकारल्यानंतर, केवळ पाच महिन्यांच्या अल्प कालावधीत पदोन्नतीचा लाभ देण्यात आला आहे.ही पदोन्नती प्रक्रिया जिल्हा परिषदेत समुपदेशन पद्धतीने राबविण्यात आली असून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व न्याय्य ठेवल्याचे विशेष आहे. पदोन्नतीसंदर्भातील सर्व बैठकांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग देखील करण्यात आले असून, ही संपूर्ण प्रक्रिया जिल्हा परिषदेच्या इतिहासातील एक आदर्श व अभिनव पाऊल ठरली आहे. विभागनिहाय पदोन्नतीचे तपशील : बांधकाम विभाग – 42 कर्मचारी, ग्रामपंचायत विभाग – 21 कर्मचारी, कृषी विभाग – 46 कर्मचारी, आरोग्य विभाग – 23 कर्मचारी, पशुसंवर्धन विभाग – 24 कर्मचारी, महिला व बाल विकास विभाग – 51 कर्मचारी , अर्थ विभाग -9, सामान्य प्रशासन विभाग – विविध संवर्गातील अधिकारी/कर्मचारी -03, शिक्षण विभाग – 93 करण्यात आलेल्या पदोन्नती मधे अर्थ विभाग – सहाय्यक लेखाधिकारी, वरिष्ठ सहाय्यक लेखा, कनिष्ठ लेखाधिकारी इत्यादी पदे,बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता, आरोग्य विभागातील आरोग्य सेवक, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेविका, आरोग्य सहाय्यका, पशुसंवर्धन विभागातील वर्णपचारक, पशुधन पर्यवेक्षक, ग्रामपंचायत विभागातील विस्तार अधिकारी, कृषी विभागातील विस्तार अधिकारी, शिक्षण विभागाकडील ग्रेडेड मुख्याध्यापक ,विस्तार अधिकारी,केंद्र प्रमुख,सामान्य प्रशासन विभागातील सहाय्यक प्रशासन अधिकारी,वरिष्ठ सहाय्यक,या संवर्गातील अधिकारी तसेच कर्मचारी यांना पदोन्नतीचा लाभ देण्यात आला आहे.एकूण 207 कर्मचारी विविध संवर्गामध्ये या कालावधीत पदोन्नत झाले आहेत .

**जळगाव झेडपी • मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांची कामगिरी**

## ५ महिन्यात २०७ कर्मचाऱ्यांना पदोन्नती

**जळगाव, (वा.)** जिल्हा परिषद जळगाव अंतर्गत कार्यरत विविध संवर्गातील एकूण २०७ कर्मचाऱ्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी मार्च २०२५ मध्ये कार्यभार स्वीकारल्यानंतर, केवळ पाच महिन्यांच्या अल्प कालावधीत पदोन्नतीचा लाभ देण्यात आला आहे. ही पदोन्नती प्रक्रिया जिल्हा परिषदेत समुपदेशन पद्धतीने राबविण्यात आली असून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक व न्याय्य ठेवल्याचे विशेष आहे. पदोन्नतीसंदर्भातील सर्व बैठकांचे व्हिडिओ रेकॉर्डिंग देखील करण्यात आले असून ही संपूर्ण प्रक्रिया जिल्हा परिषदेच्या इतिहासातील एक आदर्श व अभिनव पाऊल ठरली आहे.

२०७ कर्मचारी विविध संवर्गामध्ये या कालावधीत पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत. प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात पदोन्नतीची प्रक्रिया कमी कालावधीत पूर्ण झाली. समुपदेशन पद्धतीचा अवलंब करून कर्मचाऱ्यांना आत्मविश्वास देणारी कार्यपद्धती राबविण्यात आली. प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता राखण्यासाठी व्हिडिओ रेकॉर्डिंग करण्यात आले. अधिकारी-कर्मचारी वर्गामध्ये समाधान व प्रोत्साहनाची भावना निर्माण या पदोन्नती प्रक्रियेने जिल्हा परिषद प्रशासनातील कार्यक्षमता वाढविणे, कर्मचारी वर्गाचा मनोबल उंचावणे व कार्यक्षेत्रात स्थिरता निर्माण करणे या दृष्टीने मोठे पाऊल उचलले गेले आहे.

### विभागनिहाय पदोन्नती.....

बांधकाम विभाग – ११, ग्रामपंचायत विभाग, कृषी विभाग ५ , आरोग्य विभाग ६३, पशुसंवर्धन विभाग ०७, अर्थ विभाग १४, सामान्य प्रशासन विभाग ३, शिक्षण विभाग ९३



कर्मचाऱ्यांना पदोन्नत्या देण्यात आल्या आहेत. पदोन्नती मधे अर्थ विभाग – सहाय्यक लेखाधिकारी, वरिष्ठ सहाय्यक लेखा, कनिष्ठ लेखाधिकारी इत्यादी पदे,बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंता, आरोग्य विभागातील आरोग्य सेवक, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेविका, आरोग्य सहाय्यका, पशुसंवर्धन विभागातील वर्णपचारक, पशुधन पर्यवेक्षक, ग्रामपंचायत विभागातील विस्तार अधिकारी, कृषी विभागातील विस्तार अधिकारी, शिक्षण विभागाकडील ग्रेडेड मुख्याध्यापक ,विस्तार अधिकारी,केंद्र प्रमुख,सामान्य प्रशासन विभागातील सहाय्यक प्रशासन अधिकारी,वरिष्ठ सहाय्यक,या संवर्गातील अधिकारी तसेच कर्मचारी यांना पदोन्नतीचा लाभ देण्यात आला आहे.

विशेष वैशिष्ट्ये :
प्रथमच इतक्या मोठ्या प्रमाणात पदोन्नतीची प्रक्रिया, समुपदेशन पद्धतीचा अवलंब पारदर्शकता राखण्यासाठी व्हिडिओ रेकॉर्डिंग,

विविध विभागातील 207 कर्मचाऱ्यांना पदोन्नतीची भेट

# व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे जि.प. च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संवाद

नागरिकांचे जीवनमान अधिक सुकर करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद, जळगावने एक अभिनव उपक्रम राबवण्यास सुरुवात केली आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करनवाल यांच्या मार्गदर्शनाखाली आता नागरिकांना दररोज व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधता येत आहे.या उपक्रमाचा उद्देश नागरिक, ग्रामस्थ यांना त्यांच्या अडचणी, तक्रारी किंवा सूचना थेट प्रशासनापर्यंत पोहोचवण्याची सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. यामुळे नागरिकांना जिल्हा परिषद कार्यालयात प्रत्यक्ष येण्याची गरज भासणार नाही, तर ते घरबसल्या संवाद साधू शकतील.

मुख्य वैशिष्ट्ये - दररोज सकाळी १० ते ११ या वेळेत संवाद साधण्याची सुविधा, जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संपर्काची संधी, दररोज वरिष्ठ अधिकारी नागरिकांच्या तक्रारी थेट ऐकणार, ऐकलेल्या तक्रारी तत्काळ संबंधित विभागाकडे पाठवून त्या समस्यांचे निराकरण करण्यात येते, प्राप्त तक्रारींचा आढावा मुख्य कार्यकारी अधिकारी स्वतः घेणार असून समस्यांचे तडीस नेण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार आहे, तक्रारींची त्वरित नोंदणी आणि प्रभावी निराकरणासाठी यंत्रणा,

संवादासाठी आवश्यक लिंक आणि QR कोड जिल्हा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.zpjalgaon.gov.in) उपलब्ध आहे.

या उपक्रमांतर्गत गेल्या चार महिन्यात 108 नागरिकांनी जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद साधून आपल्या तक्रारींचे निरसन करून घेतले आहे



## नागरिकांसाठी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे थेट संवादाची सुवर्णसंधी

### जि .प. चे एक अभिनव उपक्रम राबवण्यास सुरुवात

न्यूज डेस्क | जळगाव

नागरिकांचे जीवनमान अधिक सुकर करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद, जळगावने एक अभिनव उपक्रम राबवण्यास सुरुवात केली आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करनवाल यांच्या मार्गदर्शनाखाली आता नागरिकांना दररोज व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधता येणार आहे.

संवादासाठी आवश्यक लिंक आणि QR कोड जिल्हा परिषदेच्या https://zpjalgaon.gov.in अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. नागरिकांनी या सुविधेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा परिषद प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

या उपक्रमाचा उद्देश नागरिक, ग्रामस्थ यांना त्यांच्या अडचणी, तक्रारी किंवा सूचना थेट प्रशासनापर्यंत पोहोचवण्याची सुविधा उपलब्ध करून देणे हा आहे. यामुळे नागरिकांना जिल्हा परिषद कार्यालयात प्रत्यक्ष येण्याची गरज भासणार नाही, तर ते घरबसल्या संवाद साधू शकतील.

मुख्य वैशिष्ट्ये:

- दररोज सकाळी १० ते ११ या वेळेत संवाद साधण्याची सुविधा.
- जिल्हा परिषदेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संपर्काची संधी.
- दररोज वरिष्ठ अधिकारी नागरिकांच्या तक्रारी थेट ऐकणार आहेत.
- ऐकलेल्या तक्रारी तत्काळ संबंधित विभागाकडे पाठवून त्या समस्यांचे निराकरण करण्यात येणार आहे.
- प्राप्त तक्रारींचा आढावा मुख्य कार्यकारी अधिकारी स्वतः घेणार असून, समस्यांचे तडीस नेण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार आहे.
- तक्रारींची त्वरित नोंदणी आणि प्रभावी निराकरणासाठी यंत्रणा.




चार महिन्यात 108 नागरिकांचा व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संवाद

# यशवंत पंचायतराज मधील अव्वल कामगिरी

ग्रामविकास विभागाच्या यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियानांतर्गत २०२३-२४ मधील सर्वोत्कृष्ट जिल्हा परिषद, पंचायत समिती प्रशासनाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. यात जळगाव पंचायत समिती प्रशासनाला द्वितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पंचायत राज अभियानांतर्गत वर्धा जिल्हा परिषद प्रथम, अमरावती जिल्हा परिषद द्वितीय, तर सोलापूर जिल्हा परिषद तृतीय, असे पुरस्कार देण्यात आले.

याशिवाय नागपूर पंचायत समिती प्रथम, जळगाव पंचायत समिती द्वितीय, तर सांगली पंचायत समिती तृतीय पुरस्कारासह २०२२ ते २०२४ चे सर्वोत्कृष्ट अधिकारी, कर्मचाऱ्यांनाही या वेळी सन्मानित करण्यात आले. या वेळी ग्रामविकास व पंचायत राजमंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आदी उपस्थित होते. मनरेगा, जलजीवन मिशन आणि स्वच्छ भारत अभियानासह विविध योजनांची प्रभावीपणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिकारी, कर्मचारी यांनी अंमलबजावणी करावी, असे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी महटले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेल्या शंभर दिवस कार्यक्रमांतर्गत ग्रामविकास विभागाने लक्षणीय कामगिरी बजावली आहे. याच पद्धतीने एकत्रित प्रयत्नांतून आणि समन्वयातून विभाग १५० दिवसांच्या कार्यक्रमातही उत्कृष्ट कामगिरी करून दाखवेल, याची खात्री देत ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून राज्यभरात उल्लेखनीय काम करण्यात येत आहे.



## जामनेर पंचायत समिती राज्यात द्वितीय, विभागात प्रथम..!

### पंचायत राज अभियानाचा निकाल, प्रशासकीय व्यवस्थापनाचा उत्कृष्ट दर्जा..

लोकमत न्यूज नेटवर्क

जामनेर : केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि प्रशासकीय व्यवस्थापनाचा उत्कृष्ट दर्जा राखल्यामुळे यशवंत पंचायत राज अभियानात जामनेर तालुका पंचायत समितीला २०२३-२४ या राज्यस्तरीय १७ लाख रुपयांचा द्वितीय क्रमांकाचा व नाशिक विभागात ११ लाख रुपयांचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार जाहीर झाला आहे.

ग्रामीण भागाच्या विकासात ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद या पंचायत राज संस्थांचे योगदान मोठे आहे. ग्रामीण विकासाच्या सर्व योजना पंचायतराज संस्थांमार्फत राबविल्या जातात. ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासामध्ये पंचायत राज संस्थांचे योगदान मोठे आहे. राज्यामधील विकासाच्या प्रमुख योजना पंचायत राज संस्थांमार्फत राबविल्या जातात. या प्रभावीपणे राबवण्यासाठी स्पर्धात्मक वातावरणाची गरज आहे. हे वातावरण तयार व्हावे, यासाठी ही स्पर्धा आयोजित करण्यात येते.

**प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न**

समाजाच्या त्या त्या घटकापर्यंत जाऊन संबंधित योजना पोहोचवण्याचा प्रयत्न जामनेर पंचायत समितीकडून करण्यात येत आहे.

या सुधारणेमुळे जामनेर पंचायत समितीने राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक प्राप्त झाला आहे.

**गांभीर्याने लक्ष**

विविध योजनांची अंमलबजावणी जामनेर पं. स.ने वेळोवेळी आणि नेटक्या पद्धतीने केली आहे.

**१७ लाख**

रुपयांचा राज्यस्तरीय द्वितीय पुरस्कार जामनेर पं. स.ला प्राप्त झाला असून नाशिक विभागात पहिला पुरस्कार प्राप्त झाला आहे.

**अभियानाच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न**

पंचायत राज संस्थांना त्यांनी केलेल्या कामगिरीनुसार प्रोत्साहित करून त्यांची कार्यक्षमता अधिक वाढविणे व त्यांच्यामध्ये उत्कृष्ट कामांची स्पर्धा निर्माण करणे आवश्यक आहे.

या अभियानांतर्गत जिल्ह्यातील जामनेर प. स.ने केलेल्या उत्कृष्ट कार्यासाठी राज्यस्तरीय १७ लाख रुपयांचे द्वितीय व नाशिक विभागात ११ लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. जामनेर पंचायत समितीने विविध योजनांच्या अंमलबजावणीकडे गांभीर्याने लक्ष दिल्याने हा पुरस्कार मिळाला आहे.

जि. प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करणवाल यांनीदेखील पंचायत राज अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विशेष प्रयत्न सुरू केले असून जिल्ह्यातील सर्व प. स. अधिकाधिक लोकाभिमुख करण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.



## 'पंचायत राज'मध्ये जळगाव द्वितीय

### राज्यपालांच्या हस्ते जि. प., पं. स.ना पुरस्कार वितरण


तभा वृत्तसेवा
जळगाव, २८ मे

ग्रामविकास विभागाच्या यशवंतराव चव्हाण पंचायत राज अभियानांतर्गत २०२३-२४ मधील सर्वोत्कृष्ट जिल्हा परिषद, पंचायत समिती प्रशासनाला राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. यात जळगाव पंचायत समिती प्रशासनाला द्वितीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पंचायत राज अभियानांतर्गत वर्धा जिल्हा परिषद प्रथम, अमरावती जिल्हा परिषद द्वितीय, तर सोलापूर जिल्हा परिषद तृतीय, असे पुरस्कार देण्यात आले. याशिवाय नागपूर पंचायत समिती प्रथम, जळगाव पंचायत समिती द्वितीय, तर सांगली पंचायत समिती तृतीय पुरस्कारासह २०२२ ते २०२४ चे सर्वोत्कृष्ट अधिकारी, कर्मचाऱ्यांनाही या वेळी सन्मानित करण्यात आले. या वेळी ग्रामविकास व पंचायत राजमंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासात जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत या संस्थांनी मोठे योगदान दिले आहे. राज्यात प्रधानमंत्री घरकुल योजना व इतर गृहनिर्माण योजनेतर्गत लाखो नव्या घरांच्या बांधकामास मान्यता मिळालेली आहे. ही बाब अत्यंत समाधानकारक असून मनरेगा, जलजीवन मिशन आणि स्वच्छ भारत अभियानासह विविध योजनांची प्रभावीपणे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिकारी, कर्मचारी यांनी अंमलबजावणी करावी, असे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी महटले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबवण्यात आलेल्या शंभर दिवस कार्यक्रमांतर्गत ग्रामविकास विभागाने लक्षणीय कामगिरी बजावली आहे. याच पद्धतीने एकत्रित प्रयत्नांतून आणि समन्वयातून विभाग १५० दिवसांच्या कार्यक्रमातही उत्कृष्ट कामगिरी करून दाखवेल, याची खात्री देत ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून राज्यभरात उल्लेखनीय काम करण्यात येत आहे. यामध्ये यंत्रणेतील प्रत्येकाचा कृतिशील सहभाग आणि प्रयत्न यांचा वाटा निश्चितच मोठा असल्याचे मंत्री जयकुमार गोरे यांनी म्हटले आहे.

# अमृत आहार थेट नियंत्रण






**पेसातील ११६ अंगणवाड्यांच्या 'अमृत आहारा' वर आता करडीनजर**

● दररोज टाकावे लागणार जिओ टॅगिगचे फोटो; सीईओंचे नियंत्रण

जळगावः जिल्ह्यात महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून आदिवासी भागातील कुपोषण कमी करण्यासाठी राबविल्या जाणाऱ्या अमृत आहार योजनेच्या अंमलबजावणीवर आता मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या माध्यमातून थेट नियंत्रण ठेवण्यात येत असुन अमृत आहारच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व्हॉट्सॲप ग्रुप च्या माध्यमातून दररोज देण्यात येणाऱ्या आहाराची सचित्र माहिती घेतली जात आहे.त्यासोबतच दररोज दिल्या जाणाऱ्या आहाराचे जिओ टॅगिंग असलेले छायाचित्र देखील घेतले जात आहेत.

जळगाव जिल्ह्यामध्ये महिला व बालविकास विभाग अंतर्गत एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पांतर्गत आदिवासी क्षेत्रात एकुण ४ प्रकल्प कार्यरत आहेत. चोपडा तालुक्यातील दोन प्रकल्पात एकुण ४२. रावेर तालक्यातील २ प्रकल्पात ४९ यावल प्रकल्पात २५ अशा एकुण ११६ अंगणवाड्या आदिवासी भागात कार्यरत असुन सदर प्रकल्पांमध्ये डॉक्टर एपीजे अब्दल कलाम अमत आहार योजना ही राबवली जात आहे.

**प्रत्यक्ष जेवण करतांनाचे फोटो मागवले**

व्हाट्सअपच्या माध्यमातून अंगणवाडी केंद्रांमध्ये गरोदर व स्तनदा मातांचे प्रत्यक्ष जेवण करत असताना चे जिओ टॅग फोटो व सहा महिने ते सहा वर्ष वयोगटातील बालकांचे अंडी किंवा केळी खातानाचे फोटो हे नियमित पणे ग्रुपवर मागवले जात आहे.

**आहार वाटपात येणार पारदर्शकता**

योजनेमध्ये टप्पा एक व टप्पा दोन अशाप्रकारे राबवली जात असून टप्पा एक मध्ये गरोदर व स्तनदा मातांना एक वेळेचा आहार अंगणवाडी केंद्र मध्ये दिला जातो तर टप्पा २मध्ये सहा महिने ते सहा वर्ष वयोगटातील बालकांना महिन्यातून १६ दिवस अंगणवाडी केंद्रात अंडी किंवा केळी यांचा पुरवठा केला जात असतो.हा आहार नेमका दिला जातोय कि नाही यावर आता नजर असणार आहे.जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी माननीय मीनल करनवाल यांनी अमृत आहाराच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व नियंत्रणासाठी पुढाकार घेतला असून व्हाट्सअप ग्रुप च्या माध्यमातून दररोज आहार देण्याच्या अनुषंगाने आढावा घेतला जात असून पाठपरावा केला जात आहे.

जिल्ह्यात महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या अमृत आहार योजनेच्या अमलबजावणीवर आता मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या माध्यमातून थेट नियंत्रण ठेवण्यात येत असून अमृत आहारच्या प्रभावी अमलबजावणीसाठी व्हॉट्सॲप ग्रुप च्या माध्यमातून दररोज ११६ अंगणवाड्यांकडून देण्यात येणाऱ्या आहाराची सचित्र माहिती घेतली जात आहे.

या अभिनव संकल्पनेमुळे जिल्ह्यातील कुपोषणाच्या आकडेवारीत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. सन **2024-25** या वर्षात सॅम मानांकनाची 780 बालके जिल्ह्यात होते तर 2025-26 या वर्षात या आकडेवारीत जवळपास 80 ने घट झाली असून जिल्ह्यास आज मितीस 701 इतकी सॅम बालके आहेत.

दररोज दिल्या जाणाऱ्या आहाराचे जिओ टॅगिंग असलेले छायाचित्र देखील घेतले जात आहेत.जळगाव जिल्ह्यामध्ये महिला व बालविकास विभाग अंतर्गत आदिवासी क्षेत्रात एकूण 4 प्रकल्प कार्यरत आहेत.चोपडा 2 प्रकल्पात एकूण 42 अंगणवाडी केंद्र रावेर 1 प्रकल्पात एकूण 5 अंगणवाडी केंद्र, रावेर 2 प्रकल्पात एकूण 44 अंगणवाडी केंद्र आणि यावल प्रकल्पात एकूण 25 अंगणवाडी केंद्र आदिवासी भागात कार्यरत असून सदर प्रकल्पांमध्ये डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम अमृत आहार योजना ही राबवली जात आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अमृत आहाराच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी व नियंत्रणासाठी पुढाकार घेतला असून व्हाट्सअप ग्रुप च्या माध्यमातून दररोज आहार देण्याच्या अनुषंगाने आढावा घेतला जात असून पाठपुरावा केला जात आहे.

व्हाट्सअपच्या माध्यमातून अंगणवाडी केंद्रांमध्ये गरोदर व स्तनदा मातांचे प्रत्यक्ष जेवण करत असताना चे जिओ टॅग फोटो व सहा महिने ते सहा वर्ष वयोगटातील बालकांचे अंडी किंवा केळी खातानाचे फोटो हे नियमित पणे ग्रुपवर मागवले जातात सदर फोटो चेक केले जातात.

जळगाव जिल्ह्यातील आदिवासी भागातील कुपोषण कमी करण्यासाठी डॉक्टर एपीजे अब्दुल कलाम अमृत आहार योजना प्रभावीपणे नियंत्रित करून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खऱ्या अर्थाने कुपोषण निर्मूलनासाठी महत्वाचे पाऊल उचलले आहे. बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांना ,पर्यवेक्षिका यांना व अंगणवाडी सेविका यांना सूचना देण्यात येतात. व वेळोवेळी आढावा घेतला जातो.

# प्रत्येक अंगणवाडीत बाल संगोपन रजिष्टर

बालकांचे आरोग्य उत्तम राहण्यासोबतच बालवयातच बालकांच्या प्रकृतीशी संबंधित सुक्ष्म लक्षणांची नोंद रहावी व बालकांना वेळीच उपचार करणे सोपे जाऊन बालके निरोगी रहावेत यासाठी या पुढे जिल्ह्यातील प्रत्येक अंगणवाडीत बाल संगोपन रजिष्टर ठेवण्यात येणार आहे. या रजिष्टरमध्ये बालकाच्या प्रकृतीशी संबंधित सुक्ष्म लक्षणांची नोंद करण्यात येणार आहे. याबाबतचे निर्देश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी दिले आहेत.

जळगाव जिल्ह्यात एकुण ३४३५ अंगणवाड्या आहेत. जिल्ह्यातील अंगणवाडीमध्ये बालकांच्या आरोग्याशी संबंधित विविध बाबींच्या नोंदी अंगणवाडी सेविका व आशा वर्कर यांच्या माध्यमातून घेण्यात येतात. या नोंदीमुळे ग्रामीण भागातील बालकांचे आरोग्य चांगले ठेवण्यात मदत होते. त्या सोबतच बालकांमध्ये आजाराशी संबंधित गंभीर लक्षणे आढळून आल्यास वेळेवर उपचार करणे देखील सोपे जाते. मात्र, बरेच वेळा बालकांमध्ये आढळणाऱ्या छोट्या लक्षणांकडे दुर्लक्ष होते.

काही छोट्या लक्षणांचे रुपांतर पुढे जाऊन गंभीर आजारांमध्ये होण्याची शक्यता असते. त्यामुळे बालकांमधील आरोग्याशी संबंधित विविध लक्षणांवर वेळीच निदान करता यावे व बालकांच्या आरोग्याशी संबंधित भविष्यात उद्भवणाऱ्या बाबींना वेळीच आळा घालता यावा यासाठी या पुढे ...



## जिल्ह्यातील प्रत्येक अंगणवाडीत यापुढे राहिल बालसंगोपन रजिष्टर

### • सीईओ मीनल करनवाल यांचे निर्देश

प्रतिनिधी | जळगाव

बालकांचे आरोग्य उत्तम राहण्यासोबतच बालवयातच बालकांच्या प्रकृतीशी संबंधित सुक्ष्म लक्षणांची नोंद रहावी व बालकांना वेळीच उपचार करणे सोपे जाऊन बालके निरोगी रहावेत यासाठी या पुढे जिल्ह्यातील प्रत्येक अंगणवाडीत बाल संगोपन रजिष्टर ठेवण्यात येणार आहे. या रजिष्टरमध्ये बालकाच्या प्रकृतीशी संबंधित सुक्ष्म लक्षणांची नोंद करण्यात येणार आहे. याबाबतचे निर्देश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी दिले आहेत.

जळगाव जिल्ह्यात एकूण ३ हजार चारशे पत्तीस अंगणवाडी आहेत.

जिल्ह्यातील अंगणवाडीमध्ये बालकांच्या आरोग्याशी संबंधित विविध बाबींच्या नोंदी अंगणवाडी सेविका व आशा वर्कर यांच्या माध्यमातून घेण्यात येतात.

या नोंदीमुळे ग्रामीण भागातील बालकांचे आरोग्य चांगले ठेवण्यात मदत होते. त्या सोबतच बालकांमध्ये आजाराशी संबंधित गंभीर लक्षणे आढळून आल्यास वेळेवर उपचार करणे देखील सोपे जाते. मात्र, बरेच वेळा बालकांमध्ये आढळणाऱ्या छोट्या लक्षणांकडे दुर्लक्ष होते.

काही छोट्या लक्षणांचे रुपांतर पुढे जाऊन गंभीर आजारांमध्ये होण्याची शक्यता असते. त्यामुळे बालकांमधील आरोग्याशी संबंधित विविध लक्षणांवर वेळीच निदान करता यावे व बालकांच्या आरोग्याशी संबंधित भविष्यात उद्भवणाऱ्या बाबींना वेळीच आळा घालता यावा, यासाठी या पुढे प्रत्येक अंगणवाडीत बालसंगोपन रजिष्टर ठेवण्यात येणार आहे. त्या सोबतच राष्ट्रीय आरोग्य बाल स्वास्थ मिशन कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रत्येक बालकाचा गुगल फॉर्म भरण्यात येणार आहे. या माध्यमातून प्रत्येक बालकाचे प्रकृतीचे अपडेट घेणे शक्य होणार आहे. जळगाव जिल्ह्यात ग्रामीण भागात आणि डोंगरी भागात लहान बालकांमध्ये कुपोषणाची समस्या मोठी आहे. बाल स्वास्थ्य रजिष्टरमुळे लहान वयापासूनच बालकांच्या प्रकृती संदर्भातील सर्व माहिती संकलित होणार असल्यान- कुपोषणाची लक्षणे दिसणाऱ्या बालकांवर उपचार होण्यास मदत होणार आहे.

प्रत्येक अंगणवाडीत बालसंगोपन रजिष्टर ठेवण्यात येणार आहे. त्या सोबतच राष्ट्रीय आरोग्य बाल स्वास्थ मिशन कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रत्येक बालकाचा गुगल फॉर्म भरण्यात येतो. या माध्यमातून प्रत्येक बालकाचे प्रकृतीचे अपडेट घेणे शक्य होत आहे.

जळगाव जिल्ह्यात ग्रामीण भागात आणि डोंगरी भागात लहान बालकांमध्ये कुपोषणाची समस्या मोठी आहे. बाल स्वास्थ्य रजिष्टरमुळे लहान वयापासूनच बालकांच्या प्रकृती संदर्भातील सर्व माहिती संकलित होणार असल्यान-कुपोषणाची लक्षणे दिसणाऱ्या बालकांवर उपचार होण्यास मदत होत आहे.

# बालिका पंचायत

**१५० बालिका पंचायतीची स्थापना**

**उपक्रमाद्वारे 600 पेक्षा जास्त कार्यक्रम राबविण्यात आले**

## Rural girls get voice with Balika Snehi Panchayat

**FPJ News Network**

JALGAON

The voices of rural girls, often ignored in male-dominated panchayat meetings, are now being heard through the "Balika Snehi Panchayat" initiative in Jalgaon district.

Launched by Jalgaon Zilla Parishad Chief Executive Officer Minal Karanwal, the initiative allows girls to present their concerns directly in gram sabha meetings. It aims to address issues such as a lack of school facilities, sanitation, safety, and child marriage, which otherwise remained unvoiced.





The first Balika Snehi Gram Sabha was held in Kanalda village, where girls openly raised problems, including the absence of toilets and drinking water in schools, lack of playgrounds, garbage accumulation, safety concerns due to unauthorised businesses, and the persistence of child marriage.

The gram panchayat took immediate note of the issues and initiated corrective measures, including building toilets for women, improving sanitation, and providing basic facilities in schools. The visible changes encouraged other villages to adopt the model.

Officials said the programme is not just problem-solving but also a means of instilling confidence, leadership qualities and awareness of rights among rural girls. It ensures their active participation in decision-making, previously dominated by men.

According to Ms Karanwal, the initiative is designed to sow seeds of social change by empowering girls to raise their voices. Villagers, too, acknowledged that the Balika Snehi Panchayat is creating a platform for the next generation of women leaders.

The model, which began in Jalgaon, is now spreading to other areas, with officials describing it as a step towards a new social revolution.

**बालिकांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून नेतृत्वाची संधी उपलब्ध करून देण्यासह लोकशाही मूल्यांचे बालवयातच शिक्षण मिळावे,व स्त्री शिक्षणासाठी ठोस पाऊले उचलण्याच्या दृष्टीने बालिका पंचायत हा अभिनव सुरू करण्यात आला आहे.**

- बालिका पंचायत ही एक प्रकारची ग्रामपंचायतच असते, जिथे 11 ते 21 वयोगटातील **मुली सदस्य म्हणून निवडल्या** जातात.
- या मुली स्थानिक समस्यांवर चर्चा करतात आणि ग्रामपंचायतीप्रमाणे निर्णय घेऊन त्यावर कृती करतात.
- हा उपक्रम गावांमध्ये सकारात्मक बदल घडवतो, जसे की जळगाव जिल्ह्यातील अनेक गावात अतिक्रमण , टवाळखोरी ई. प्रकारात घट झाली. याचे श्रेय बालिका पंचायतीच्या प्रयत्नांना दिले जाते.
- यामुळे मुलींना त्यांच्या हक्कांबाबत आणि जबाबदाऱ्यांबाबत जागरूकता येते.
- हा उपक्रम भारतीय समाजाच्या विकासासाठी एक नवीन दृष्टिकोन देतो, जो समुदायाच्या सहभाग आणि सक्षमीकरणावर भर देतो.
- जिल्ह्यात **150** पेक्षा जास्त बालिका पंचायती स्थापन करण्यात आलेल्या आहेत.
- बालिका पंचायत या उपक्रमाद्वारे आतापर्यंत **600** पेक्षा जास्त कार्यक्रम राबविण्यात आलेले आहेत.

# महिला शौचालये / हिरकणी कक्ष



जळगाव | शुक्रवार | दि. २० जून २०२५

**जि. प. हिरकणी कक्षाचे खा. स्मिता वाघ यांच्या हस्ते उद्‌घाटन**

## हिरकणी कक्षाचे नुतनीकरण

देशोन्नती वृत्तसंकलन

जळगाव : जिल्हा परिषदेत महिला कर्मचाऱ्यांसाठी नूतनीकरण करण्यात आलेल्या हिरकणी कक्षाचे उद्‌घाटन खा. स्मिता वाघ यांच्या हस्ते जिल्हा परिषदेच्या जुन्या इमारतीत १९ जून रोजी झाले.

प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्नेहा पवार, माध्यमिक शिक्षण अधिकारी कल्पना चव्हाण तसेच जिल्हा परिषदेतील विविध विभागांतील महिला अधिकारी व कर्मचारी उपस्थित होत्या.

**जि.प. महिला कर्मचारी नव्हे तर ग्रामीण भागातील महिलांना लाभ घेण्याचे आवाहन**

उद्‌घाटन प्रसंगी बोलताना खा. स्मिता वाघ म्हणाल्या की, 'एका महिलेचे दुःख दुसरी महिलाच अधिक चांगल्या प्रकारे समजू शकते. जिल्हा परिषदेतील महिला कर्मचाऱ्यांच्या गरजा आणि अडचणी समजून घेत मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी सुसज्ज हिरकणी कक्षाची निर्मिती करून एक स्तुत्य उपक्रम राबविला आहे. महिला कर्मचाऱ्यांनी या सुविधेचा योग्य उपयोग करावा. यावेळी उपस्थित महिलांना मार्गदर्शन करताना मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल म्हणाल्या की, 'हिरकणी कक्ष ही सुविधा केवळ जिल्हा परिषदेतील महिला कर्मचाऱ्यांसाठीच नव्हे, तर जिल्हा परिषदेच्या कामानिमित्त ग्रामीण भागातून येणाऱ्या महिलांसाठी देखील उपलब्ध [illegible]. सर्व महिलांनी ही सुविधा निर्भीडपणे व आत्मविश्वासाने वापरावी.' प्रास्ताविक उपमुख्य कार्यकारी अधिकारी [illegible]वार यांनी केले. कार्यक्रमादरम्यान महिलांच्या हक्कांची जाणीव आणि त्यांच्या सोयीसाठी प्रशासनाच्या [illegible]नेचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणून हिरकणी कक्ष उभा राहत असल्याचे सर्वच स्तरातून मान्य करण्यात आले.

जळगाव जिल्हा परिषदेत महिला कर्मचाऱ्यांसाठी नूतनीकरण करण्यात आलेल्या हिरकणी कक्षाचे उद्घाटन खासदार मा. स्मिता वाघ यांच्या हस्ते जिल्हा परिषदेच्या जुन्या इमारतीत गुरुवारी, दि. 19 जून रोजी संपन्न झाले.

जिल्हा परिषदेतील महिला कर्मचाऱ्यांच्या गरजा आणि अडचणी समजून घेत मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी सुसज्ज हिरकणी कक्षाची निर्मिती करून एक स्तुत्य उपक्रम राबविला आहे. महिला कर्मचाऱ्यांना या सुविधेचा योग्य उपयोग व्हावा व सर्व महिलांनी ही सुविधा निर्भीडपणे व आत्मविश्वासाने वापरावी यासाठी या कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे.

“हिरकणी कक्ष ही सुविधा केवळ जिल्हा परिषदेतील महिला कर्मचाऱ्यांसाठीच नव्हे, तर जिल्हा परिषदेच्या कामानिमित्त ग्रामीण भागातून येणाऱ्या महिलांसाठी देखील उपलब्ध आहे.

महिलांच्या हक्कांची जाणीव आणि त्यांच्या सोयीसाठी प्रशासनाच्या संवेदनशीलतेचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणून हिरकणी कक्ष उभा राहत असल्याचे सर्वच स्तरातून मान्य करण्यात आले.

# महिलांच्या सुरक्षेसाठी 'अलर्टो एसओएस' ॲप

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाच्या माध्यमातून ग्रामविकासासोबतच सुरक्षित, सशक्त आणि डिजिटल गाव घडविण्यावर भर दिला जात आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मा. मिनेल करनवाल यांच्या संकल्पनेनुसार जळगाव जिल्ह्यात विविध नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.

याच अनुषंगाने यावल तालुक्यातील साकळी ग्रामपंचायतीने गावकरी बांधव आणि विशेषतः महिलांच्या सुरक्षेसाठी **“ALERTO SOS”** हे **आधुनिक मोबाईल अॅप विकसित** केले आहे.या अॅपच्या माध्यमातून संकटाच्या प्रसंगी केवळ एका क्लिकवर मदत मिळवता येते. अॅपद्वारे दिलेल्या आपत्कालीन संपर्क क्रमांकावर सायरन वाजवता येतो, लोकेशन शेअर करता येते, व्हॉइस मेसेज पाठवून मदत मागवता येते.या अॅपमध्ये वापरकर्त्यांना ३ नातेवाईकांचे नंबर आपत्कालीन संपर्क म्हणून नोंदविण्याची सुविधा असून, त्यांना तात्काळ लोकेशन, एसएमएस आणि नोटिफिकेशनद्वारे माहिती पाठविण्याची सोय आहे. तसेच, २ कम्युनिटी ग्रुप्सना एकाचवेळी मेसेज पाठविण्याची सुविधाही उपलब्ध आहे.याशिवाय, 112, 100, 109, 108, 139, 1033, 1091, 1098, 1930 या हेल्पलाइन क्रमांकांवर थेट मदत मागवण्याची सुविधा देखील अॅपमध्ये आहे.

बालसुरक्षेसाठी या ॲपमध्ये विशेष सुविधा देण्यात आल्या आहेत. पालकांना मुलांच्या मोबाईलवरील ब्राउझर सर्च हिस्टरी पाहण्याची, अभ्यासाच्या वेळापत्रकानुसार अलार्म सेट करण्याची आणि सोशल मीडियावरील चॅटिंगवर देखरेख ठेवण्याची सुविधा अॅपमधून मिळते. विशेष म्हणजे SOS बटण दाबल्यानंतर एक तासापर्यंत जीपीएस ट्रॅकिंग सुरू राहते, ज्यामुळे संकटात असलेल्या व्यक्तीचे अचूक ठिकाण नातेवाईक तत्काळ ट्रॅक करू शकतात. हा उपक्रम ग्रामीण भागातील महिला व बालसुरक्षेसाठी एक आदर्श ठरू लागला असून, डिजिटल ग्रामसुरक्षेच्या दिशेने हे एक नव्या युगाचे पाऊल असल्याचे जनतेतून समाधान व्यक्त होत आहे.



## महिलांच्या सुरक्षेसाठी ‘अलर्टो एसओएस’ ॲप

### जिल्हा परिषद सीईओंच्या प्रेरणेतून विकसित ; ‘समृद्ध पंचायतराज’ अंतर्गत अभिनव संकल्पना

**सकाळ वृत्तसेवा**

जळगाव, ता. ११ : राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या माध्यमातून ग्रामविकासासोबतच सुरक्षित, सशक्त आणि डिजिटल गाव घडविण्यावर भर दिला जात आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या संकल्पनेनुसार जिल्ह्यात विविध नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. याच अनुषंगाने यावल तालुक्यातील साकळी ग्रामपंचायतीने गावकरी बांधव आणि विशेषतः महिलांच्या सुरक्षेसाठी ‘अलर्टो एसओएस’ हे आधुनिक मोबाईल ॲप विकसित केले आहे. या ॲपच्या माध्यमातून संकटाच्या प्रसंगी केवळ एका क्लिकवर मदत मिळवता येते.

ॲपद्वारे दिलेल्या आपत्कालीन संपर्क क्रमांकावर सायरन वाजवता येतो, लोकेशन शेअर करता येते, व्हॉइस मेसेज पाठवून मदत मागवता येते. या ॲपमध्ये वापरकर्त्यांना ३ नातेवाईकांचे क्रमांकाचे आपत्कालीन संपर्क म्हणून नोंदविण्याची सुविधा असून, त्यांना तत्काळ लोकेशन, एसएमएस आणि नोटिफिकेशनद्वारे माहिती पाठविण्याची सोय आहे. तसेच, २ कम्युनिटी ग्रुप्सना एकाचवेळी मेसेज पाठविण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

याशिवाय, ११२, १००, १०९, १०८, १३९, १०३३, १०९७, १०९८, १९३० या हेल्पलाइन क्रमांकांवर थेट मदत मागवण्याची सुविधा देखील ॲपमध्ये आहे. बालसुरक्षेसाठी या ॲपमध्ये विशेष सुविधा देण्यात आल्या आहेत. पालकांना मुलांच्या मोबाईलवरील ब्राउझर सर्च हिस्टरी पाहण्याची, अभ्यासाच्या वेळापत्रकानुसार अलार्म सेट करण्याची आणि सोशल मीडियावरील चॅटिंगवर देखरेख ठेवण्याची सुविधा ॲपमधून मिळते. विशेष म्हणजे, एसओएस बटण दाबल्यानंतर एक तासापर्यंत जीपीएस ट्रॅकिंग सुरू राहते, ज्यामुळे संकटात असलेल्या व्यक्तीचे अचूक ठिकाण नातेवाईक तत्काळ ट्रॅक करू शकतात. साकळी ग्रामपंचायतीचा हा उपक्रम ग्रामीण भागातील महिला व बालसुरक्षेसाठी एक आदर्श ठरू लागला असून, डिजिटल ग्रामसुरक्षेच्या दिशेने हे एक नव्या युगाचे पाऊल असल्याचे जनतेतून समाधान व्यक्त होत आहे.

# महिला बचत गट मॉल

जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेच्या जीवन्नोती अभियानच्या माध्यमातून जिल्ह्यात ३० हजार बचत गट व त्यात तीन लाखापेक्षा अधिक महिला कार्यरत असुन विविध वस्तूंचे उत्पादन करीत आहे. त्या महिला बचत गटांनी उत्पादीत केलेल्या वस्तूंना हक्काचे दालन उपलब्ध करून देण्यात आले आहे. जिल्ह्यात डी मार्टच्या धर्तीवर बचत गटांसाठी ५ ठिकाणी 'रूरल मार्ट' हे दालन उभारण्यात आले असून त्यांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. हे रुरल मार्ट बहिणाई मार्ट नावाने ओळखले जाणार आहे. जिल्ह्यात उमेदच्या माध्यमातून जवळपास ३ लाख महिलांना बचत गटाच्या माध्यमातून स्वयंरोजगार मिळाला आहे. या माध्यमातून दिवाळीच्या सणात महिला बचत गटांनी उभारलेल्या मॉल च्या माध्यमातून १.१८ कोटी रुपये उत्पन्न बचत गटांना झाले आहे

पाळधी, जामनेर सह ५ ठिकाणी मॉल

जिल्ह्यात पाळधी, नगरदेवळा, जामनेर, महावद, साकेगाव या ठिकाणी रूरल मार्टचे भव्य दालन उभारण्यात आलेले आहेत, या ठिकाणी महिला बचत गटांचे साहित्य, खाद्य पदार्थ हे विक्रीसाठी ठेवले जाणार आहे.

५ कोटीची तरतूद; ग्रामीण भागाला बुस्टर

जिल्ह्यातील पाच रूरल मार्ट साठी जिल्हा नियोजन मंडळाकडून ५ कोटीचा निधी उपलब्ध करण्यात आला आहे. तसेच त्यास पालकमंत्र्यांकडून मान्यता देखील देण्यात आली आहे.





जिल्ह्यात 'बहिणाई मार्ट'चे पाच पायलट प्रोजेक्ट

बचत गटांसाठी मिळणार हक्काची बाजारपेठ; पाच गावांची निवड,५ कोटी निधीला मान्यता

पाळधी,जामनेरसह ५ ठिकाणी मॉल

५ कोटीची तरतूद; ग्रामीण भागाला बुस्टर

बचत गट सुसाट,७२४ कोटीचे कर्ज

**दिवाळीत महिला बचत गटांनी उभारलेल्या मॉलच्या माध्यमातून १.१८ कोटी रुपये उत्पन्न प्राप्त**

# गृह निर्माण योजनेअंतर्गत घरकुले पूर्ण करण्यात जळगाव जिल्ह्याची अव्वल कामगिरी

## घरकुले पूर्ण करण्यात जळगाव जिल्हा अव्वल

१३४ टक्के घरकुले पूर्ण; ग्रामीण गृहनिर्माण संचालकाकडून अभिनंदन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसीय कार्यक्रमांची घोषणा केली होती. त्या अंतर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी १०० दिवसीय उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. त्या अंतर्गत जळगाव जिल्हयाने दिलेल्या उद्दिष्टाच्या अनुषंगाने उल्लेखनीय यश संपादन केले असून १०० दिवसात ८ हजार ३६२ पैकी ११ हजार २४४ म्हणजे १३४ टक्के घरकुले पूर्ण केली आहेत. याबद्दल ग्रामीण गृहनिर्माण योजनेचे संचालक डॉ. राजाराम दिघे यांनी जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजीव लोखंडे यांचे अभिनंदन केले आहे.

जळगाव जिल्हयात एकाच दिवशी ३५ हजार ४२३ घरकुलांचे भूमिपूजन करण्यात आले . दुसऱ्या टप्प्यातील उद्दिष्ट तातडीने पूर्ण करून, लाभाथ्यर्थ्यांचे घरकुलांचे स्वप्न पूर्ततेसाठी शासनासोब जि. प. प्रशासन प्रयत्न करत आहे. घरकुलांची कामं लवकरात लवकर सुरू करण्यासाठी जिल्हयातील स गटविकास अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी, रोजगार सेवक, सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व इतरांनी सर्वांनी सहभाग नोंदवून लाभाथ्र्यांकडून घरकूल सुरू करून घेतली तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालकांनी प्रत्याक्ष तालुकास्तरीय भेटी घेऊन जास्तीत जास्त घरकुले सुर करण्यात आली.



घरकुले पूर्ण करण्यात जळगाव जिल्हा अव्वल

१३४ टक्के घरकुले पूर्ण; ग्रामीण गृहनिर्माण संचालकाकडून अभिनंदन

जळगावः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसीय कार्यक्रमांची घोषणा केली होती.त्या अंतर्गत ग्रामीण गृहनिर्माण योजनांसाठी १०० दिवसीय उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते.त्या अंतर्गत जळगाव जिल्ह्याने दिलेल्या उद्दिष्टाच्या अनुषंगाने उल्लेखनीय यश संपादन केले असून १०० दिवसात ८ हजार ३६२ पैकी ११ हजार २४४ म्हणजे १३४ टक्के घरकुले पूर्ण केली आहेत.याबद्दल ग्रामीण गृहनिर्माण योजनेचे संचालक डॉ.राजाराम दिघे यांनी जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजीव लोखंडे यांचे अभिनंदन केले आहे.

३० डिसेंबर २०२४ रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवशीय कार्यक्रमाची घोषणा केली होती.त्या अंतर्गत ग्रामीण गृह निर्माण योजनांसाठी १०० दिवसीय उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते.यात जळगाव जिल्ह्याने ग्रामीण गृहनिर्माण योजने अंतर्गत दिलेल्या उद्दिष्टाच्या अनुषंगाने ८३६२ पैकी ११२४४ म्हणजेच १३४ टक्के घरकूले पूर्ण केली आहेत.या बद्दल ग्रामीण गृहनिर्माण संचालक यांनी पत्र पाठवून प्रशंसनीय आणि प्रेरणादायी कामगिरी व आपल्या नेतृत्वात टीमच्या समर्पित प्रयत्नांमुळे अनेक कुटुंबांचे जीवन अधिक सुरक्षित आणि स्थिर झाल्याबद्दल अभिनंदन केले आहे.



जळगाव जिल्ह्यात एकाच दिवशी ३५ हजार ४२३ घरकुलांचे भूमिपूजन

घरकूल योजनांच्या माध्यमातून ७० हजार घरकुलांचे बांधकाम सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत राज्यभरात घरकुलांची कामं सुरू आहेत. या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यांतर्गत गुरुवारी जळगाव जिल्ह्यात एकाच दिवशी तब्बल ३५ हजार ४२३ घरकुलांच्या कामांचे भूमिपूजन करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषद प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

जळगाव जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजनेच्या टप्पा दोन अंतर्गत ८६ हजार ६८९ घरकुलांची मंजुरी देण्यात आली होती. यापैकी ७१ हजार ६४५ लोकांना पहिल्या हप्त्याची रक्कम वितरित करण्यात आली होती. तसेच ४ मार्च २०२५ पासून एकाच वेळी प्रधानमंत्री आवास योजनेच्या ग्रामीण टप्पा दोनमधील घरकुलांच्या मोहिमेला सुरुवात करण्यात आली. ४ मार्च रोजी ३५ हजार २६४ इतक्या घरकुलांच्या कामांना सुरुवात झाली होती. तर गुरुवारी ३५ हजार ४२३ घरकुलांच्या कामांचे भूमिपूजन करण्यात आले. त्यामुळे जिल्ह्यात सद्यस्थितीत एकूण ७० हजार ६८७ घरकुलांची कामे सुरू आहेत.

उद्दिष्ट पूर्तीचे प्रयत्न...

दुसऱ्या टप्प्यातील उद्दिष्ट तातडीने पूर्ण करून, लाभार्थ्यांचे घरकुलांचे स्वप्न पूर्ततेसाठी शासनासोबत जि. प. प्रशासन प्रयत्न करत आहे. घरकुलांची कामं लवकरात लवकर सुरू करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व गटविकास अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कर्मचारी, रोजगार सेवक, सरपंच, उपसरपंच, सदस्य, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता व इतरांनी सर्वांनी सहभाग नोंदवून लाभार्थ्यांकडून घरकूल सुरू करून घेतली तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालकांनी प्रत्यक्ष तालुकास्तरीय भेटी घेऊन जास्तीत जास्त घरकुले सुरू करण्यात आली.

# हि दिवाळी नविन घरी

## ZP launches housing scheme

**Vijay Pathak**
JALGAON

Jalgaon district has taken the lead in the implementation of the Prime Minister's Housing Scheme – Rural (Phase 2), with the Zilla Parishad launching an innovative initiative titled "This Diwali, New Home", aimed at ensuring homeless citizens in rural areas get permanent shelter by the festival.

The initiative, conceptualised by Zilla Parishad Chief Executive Officer Minal Karanwal, targets the completion of at least 75% of the 90,000 homes currently under construction in the district before Diwali. "Our aim is to provide quality, safe and durable houses to the poor, marginalised, and homeless, using local materials and skilled manpower," Karanwal told The Free Press Journal.

To encourage timely completion, Gram Panchayats that finish housing projects by Sep 30 will be honoured with special prizes. This move is expected to foster positive competition among panchayats, thereby speeding up the execution of the scheme.

The initiative not only seeks to provide housing but also aims to offer families the joy of beginning a new life in their own homes during the auspicious Diwali festival. It reflects the district administration's commitment to inclusive development and social responsibility.

जिल्ह्यातील ग्रामीण भागातील बेघर ग्रामस्थांना आपला हक्काचा निवारा मिळावा, या दृष्टीने सुरु करण्यात आलेल्या पंतप्रधान आवास योजनेच्या अंमलबजावणीत जळगाव जिल्ह्याने आघाडी घेतली असून जिल्ह्यातील बेघर ग्रामस्थांना आपल्या हक्काचा निवारा लवकरात लवकर मिळावा व ग्रामस्थांचे दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर गृह प्रवेशाचे स्वप्न पूर्ण व्हावे या करिता जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून "हि दिवाळी नविन घरी" या अभिनव योजनेची आखणी केली आहे. या योजनेंतर्गत दिवाळी पूर्वी म्हणजेच ३० सप्टेंबर पूर्वी घरकुलाचे बांधकामे पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना पारितोषिक देऊन गौरविण्यात येणार आहे.

या अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यातील **३६** ग्रामपंचायतींनी दिवाळीपूर्वी १००% घरे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट साध्य आहे

जळगाव जिल्ह्याने घरकुलांची मंजुरी साणि घरकुले पुर्णत्वात मोठी आघाडी घेतली आहे. सद्य स्थितीत पंतप्रधान आवास योजना टप्पा २ अंतर्गत १० हजार घरकुलाचे बांधकाम सुरु आहेत. त्या पैकी **७५ टक्के घरे दिवाळी पूर्वी पूर्ण करण्याचा मानस** जिल्हा परिषद जळगाव व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी केला.

स्वतचे हक्काचे घर हे प्रत्येक व्यक्तीचे एक स्वप्न असते. या स्वप्नांना बळ देऊन सामान्य गोरगरीब व तळागळातील व्यक्तींना आपला हक्काचा निवारा लवकरात लवकर कसा देता येईल हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेऊन श्रीमती मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून हि दिवाळी नविन घरी हि अभिनयव योजना अंमलात येत आहे.

सामान्य नागरिक . ग्रामस्थ यांचे दिवाळीसारख्या साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेल्या अत्यंत पावन पर्वाच्या प्रसंगी आपल्या हक्काच्या घरात गृह प्रवेशाचे स्वप्न या माध्यमातून पूर्ण होणार आहे दिवाळी पूर्वी धरकुलांचे बांधकामाचे उद्दिष्ट पूर्ण करणा-या ग्रामपंचायतींना या योजनेंतर्गत पारितोषिक देण्यात येणार आहे. पारितोषिकाच्या माध्यमातून घरकुल बांधकामाची स्पर्धा निर्माण व्हावी व गोरगरीब जनतेला आपले आयुष्यभराचे उराशी बाळगलेले स्वप्न पूर्ण करता यावे या सामाजिक भाकोतून हि योजना आखण्यात आली आहे.

**36 ग्रामपंचायती ठरल्या अव्वल**

# कचरा मुक्त गांव अभियान

नांदेड जिल्हयात ग्रामिण भागात 'स्वच्छतेचा रविवार' ही संकल्पना राबविली. त्यावर काम केले आणि कचरा प्रक्रीयेसाठी प्रकल्प उभारला मात्र बदली झाल्यानंतर दृष्टीक्षेपात असलेले काम अपुर्ण राहीले मात्र जिल्हयात ग्रामिण भागात 'कचरामुक्त गावं' संकल्पना राबवून यशस्वी करणार आहे. त्यास जनतेने साथ दयावी असे आवाहन करत नवनिर्वाचित जि.प.च्या सीईओ मिनल करनवाल यांनी आपला संकल्प सांगितला.

शिक्षण, घरकुल, जलजीवनवर केंद्रीकरण

जिल्हयात घरकुलांची कामे मोठ्या प्रमाणात मंजुर आहे. येत्या सोमवार पासुन यात पुन्हा गती देण्याचा प्रयत्न आहे. शाळांचा विकास व शिक्षण यावर भर आहे. शिक्षक आणि ग्रामसेवक गावात दररोज येणे अपेक्षीत असून याबाबत शिस्त लावली जाईल, स्वच्छतेबाबत गांभीर्याने संकल्पना राबवली जाईल त्यात काम कुचराई करणाऱ्यांवर वेळ प्रसंगी कठोर कारवाई करेल असा ईशारा देखील त्यांनी दिला. आरोग्य आणि जल जीवन मिशन यांसारख्या महत्त्वपूर्ण योजनांवर विशेष भर देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या आव्हानाला प्रतिसाद देत आजमीतीस जिल्हयातील 300 पेक्षा अधिक ग्रामपंचायतींमध्ये हा उपक्रम सुरू आहे



## जिल्ह्यात 'कचरामुक्त गाव' संकल्पना राबवणार

### जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी स्विकारला पदभार

जळगाव : नांदेड जिल्ह्यात ग्रामिण भागात 'स्वच्छतेचा रविवार' ही संकल्पना राबविली.त्यावर काम केले आणि कचरा प्रक्रीयेसाठी प्रकल्प उभारला मात्र बदली झाल्यानंतर दृष्टीक्षेपात असलेले काम अपुर्ण राहीले मात्र जिल्ह्यात ग्रामिण भागात 'कचरामुक्त गाव' संकल्पना राबवून यशस्वी करणार आहे त्यास जनतेने साथ द्यावी असे आवाहन करत नवनिर्वाचित जि.पच्या सीईओ मिनल करनवाल यांनी पत्रकारांशी संवाद साधतांना आपला संकल्प सांगितला.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अंकित यांची छत्रपती संभाजीनगर येथे मुख्य कार्यकारी अधिकारीपदी बदली झाल्यानंतर त्यांच्या रिक्त जागी नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीनल करणवाल यांची नियुक्ती करण्यात आली आहे. गुरुवार, दि. २० मार्च रोजी श्रीमती करणवाल यांनी प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी यांच्याकडून पदभार स्वीकारला. यावेळी जिल्हा परिषदेच्या

▸▸ पान २ वर

### शिक्षण, घरकुल, जलजीवनवर फोकस

जिल्ह्यात घरकुलांची कामे मोठ्या प्रमाणात मंजुर आहे. येत्या सोमवार पासुन यात पुन्हा गती देण्याचा प्रयत्न आहे. शाळांचा विकास व शिक्षण यावर भर आहे. शिक्षक आणि ग्रामसेवक गावात दररोज येणे अपेक्षीत असुन याबाबत शिस्त लावली जाईल, स्वच्छतेबाबत गांभीर्याने संकल्पना राबवली जाईल त्यात काम कुचराई करणाऱ्यांवर वेळ प्रसंगी कठोर कारवाई करेल असा ईशारा देखील त्यांनी दिला. आरोग्य आणि जल जीवन मिशन यांसारख्या महत्त्वपूर्ण योजनांवर विशेष भर देण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

# ‘समृद्ध ग्रामपंचायत अभियान’

लोकमत

मस्ट READ

## जिल्ह्यात ‘पंचायत सक्षमीकरण अभियान’

### जि.प.मुळे ३०० ग्रामपंचायतींना मिळणार विकासाची नवी दिशा

लोकमत न्यूज नेटवर्क

जळगाव : जिल्ह्यातील ग्रामपंचायतींना पूर्णपणे सक्षम आणि समृद्ध करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांच्या नेतृत्वाखाली 'पंचायत सक्षमीकरण अभियान' सुरू करण्यात आले आहे. या अभियानामुळे जिल्ह्यातील ग्रामीण विकासाला मोठी चालना मिळणार आहे.

सोमवारी, जामनेर तालुक्यातील हिवरखेडा बु. येथे राष्ट्रीय ग्राम स्वराज्य अभियानाच्या आर्थिक विकास आणि उत्पन्न वाढ या घटकांतर्गत आयोजित सोलर ड्रायिंग प्रोजेक्टच्या भूमिपूजन कार्यक्रमात या अभियानाची औपचारिक घोषणा करण्यात आली.




निवडलेल्या ग्रामपंचायतींमध्ये नियोजनबद्ध विकास आराखडे तयार करणार

### अभियानाची प्रमुख उद्दिष्टे...

या अभियानांतर्गत जळगाव जिल्ह्यातील ३०० ग्रामपंचायतींची निवड करण्यात आली आहे.

ग्राम पंचायतींना प्रशासकीय, आर्थिक, तांत्रिकदृष्ट्या सक्षम बनवण्याचा निर्धार करण्यात आला आहे.

निवडलेल्या ग्रामपंचायतींमध्ये नियोजनबद्ध विकास आराखडे तयार करणे, उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना, शाश्वत विकासाला प्रोत्साहन दिले जाणार आहे, अशी माहिती देण्यात आली.

### ‘गाव समृद्ध तर जिल्हा समृद्ध’

मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी या अभियानाबद्दल माहिती देताना सांगितले की, गाव समृद्ध झाले तर जिल्हा प्रगती करतो. ग्रामपंचायतींचे सक्षमीकरण हे केवळ कागदावरचे काम नसून, प्रत्यक्ष कृतीतून गावांचा सर्वांगीण विकास साधण्याचे आमचे ध्येय आहे.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी संबंधित पंचायत समित्या, ग्रामविकास अधिकारी, ग्रामसेवक आणि स्थानिक नागरिक यांचे सक्रिय सहकार्य घेतले जाणार आहे. या अभियानामुळे गावागावांमध्ये विकासाचे सकारात्मक वातावरण निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमाला जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य संजय गरुड, जे. के. चव्हाण यांच्यासह अनेक अधिकारी आणि पदाधिकारी उपस्थित होते.

Hello Jalgaon
Page No. 2 May 22, 2025
Powered by: erelego.com

## जिल्ह्यात ३०० ग्रा.पंमध्ये एकाच दिवशी स्वच्छता, वृक्षारोपण मोहीम

### जि.प सीईओंच्या संकल्पनेतून ‘ समृद्ध ग्रामपंचायत अभियान ’ सुरू



जळगाव: जिल्ह्यातील ग्रामपंचायती सक्षम, स्वयंपूर्ण व समृद्ध व्हाव्यात, तसेच गावांचा सर्वांगीण विकास सुनिश्चित व्हावा, या उद्दिष्टाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून ‘समृद्ध ग्रामपंचायत अभियान’ राबविण्यात येत आहे.

या अभियानाअंतर्गत जिल्ह्यातील निवडलेल्या ३०० ग्रामपंचायतींमध्ये सोमवार,दि.३० जून रोजी स्वच्छता व वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमाची औपचारिक सुरुवात धरणगाव तालुक्यातील मुसळी गावातून मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या उपस्थितीत करण्यात आली. या वेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब अकलाडे, गट विकास अधिकारी किशोर वानखेडे, ग्रामस्थ व विविध विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ‘ स्वच्छतेचा वार सोमवार ’संकल्पना

● स्वच्छतेच्या जनजागृतीसाठी ‘स्वच्छतेचा वार सोमवार’ अशी संकल्पना राबवून प्रत्येक सोमवारी गावात स्वच्छता मोहीम राबवली जाणार आहे . याचाच एक भाग म्हणून ३० जून रोजी एकाच दिवशी जिल्ह्यातील ३०० गावांमध्ये एकत्रित स्वच्छता मोहीम पार पडली . स्वच्छतेबरोबरच ‘एक पेड माँ के नाम’ या विशेष उपक्रमांतर्गत वृक्षारोपणही करण्यात आले . या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाबरोबर मातृस्मरणही साधले गेले .या अभियानामुळे गावांचा सर्वांगीण विकास, प्रशासनाची कार्यक्षमता आणि ग्रामस्थांची समाधानकारक सेवा या तिन्ही बाबींना बळ मिळणार आहे

जिल्ह्यातील ग्रामपंचायती सक्षम, स्वयंपूर्ण व समृद्ध व्हाव्यात, तसेच गावांचा सर्वांगीण विकास सुनिश्चित या व्हावा, उद्दिष्टाने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून 'समृद्ध ग्रामपंचायत अभियान' राबविण्यात येत आहे.

या अभियानाअंतर्गत जिल्ह्यातील निवडलेल्या ३०० ग्रामपंचायतींमध्ये सोमवार, दि.३० जून रोजी स्वच्छता व वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमाची औपचारिक सुरुवात धरणगाव तालुक्यातील मुसळी गावातून मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

**'स्वच्छतेचा वार सोमवार' संकल्पना**

स्वच्छतेच्या जनजागृतीसाठी 'स्वच्छतेचा वार सोमवार' अशी संकल्पना राबवून प्रत्येक सोमवारी गावात स्वच्छता मोहीम राबवली जाते. याचाच एक भाग म्हणून ३० जून रोजी एकाच दिवशी जिल्ह्यातील ३०० गावांमध्ये एकत्रित स्वच्छता मोहीम पार पडली.

स्वच्छतेबरोबरच 'एक पेड माँ के नाम' या विशेष उपक्रमातंर्गत वृक्षारोपणही करण्यात आले. या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाबरोबर मातृस्मरणही साधले गेले. या अभियानामुळे गावांचा सर्वांगीण विकास, प्रशासनाची कार्यक्षमता आणि ग्रामस्थांची समाधानकारक सेवा या तिन्ही बाबींना बळ मिळणार आहे

# ५० लक्ष निधी सुक्ष्म अन्न प्रक्रिया विशेष योजनेमधुन उपलब्ध

## अन्न प्रक्रिया उद्योगासाठी महिलांना अर्थसहाय्य

**• जिल्हा परिषद कृषी विभागातर्फे बचत गटाच्या महिलांना पालकमंत्र्याच्या हस्ते पूर्व संमतीपत्र वाटप**

**प्रतिनिधी । जळगांव**
जिल्हा परिषदेच्या कृषी विभागातर्फे बचत गटाच्या महिलांना अन्न प्रक्रिया उद्योगासाठी पालकमंत्र्यांच्या हस्ते आज दि. २ मे रोजी पूर्व संमती प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. यावेळी बिलवाडी येथील बचत गटाच्या महिलांसह सीईओ मीनल करनवाल उपस्थित होत्या.



जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून जिल्हा परिषदेच्या कृषि विभागाने ग्रामिण शेतकरी महिलांना आर्थिक स्वावलंबन व रोजगार निर्मितीच्या उद्देशाने जिल्हा परिषद सेस निधीतून रु.५० लाखांचा निधी हा सूक्ष्म अन्न प्रक्रिया विशेष योजनेमधुन उपलब्ध करुन दिला आहे. १ मे या महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने काल जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात बिलवाडी (ता.जळगाव) येथील रघुवीर समर्थ महिला शेतकरी गटाच्या सदस्यांना पापड व डाळ उद्योगाकरीता पूर्व संमती देण्यात आली . या वेळी जिल्हाधिकारी आयुष प्रसाद , सीईओ मिनल करनवाल ,अति.मु.का.अ रणधीर सोमवंशी आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजू लोखंडे, कृषी विकास अधिकारी पद्मनाभ म्हस्के हे उपस्थित होते.महिलांना बचत गटाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध व्हावा व महिला आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण आणि सक्षम व्हाव्यात, यासाठी जिल्हा परिषदेमार्फत ही योजना आखण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या स्व उत्पन्नाच्या निधीतून २५ बचत गटांना ५० लाख रुपये इतक्या निधीच्या माध्यमातून अन्न प्रक्रिया उद्योगासाठी आवश्यक असलेले पापड मशीन, डाळमिल,लाकडी तेलघाणा यासह इतर पूरक साधने पुरविण्यात येणार आहेत. यासोबतच जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडुन शेतकऱ्यांना अधिक कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने रु. ५५ लक्ष हे शेतकरी उत्पादक कंपनीसाठी ड्रोन खरेदी करता उपलब्ध केले आहेत. तर जिवामृत स्लरी फिल्टरकरीता रु.१२ लक्ष उपलब्ध करून दिले आहेत.

## झेडपी कृषी विभागातर्फे महिला गटांना अनुदान

**उद्योगासाठी दिले ५० लाखांचे पूरक साहित्य**



जळगाव, (वा.) जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने ग्रामिण शेतकरी महिलांना आर्थिक स्वावलंबन व रोजगार निर्मितीच्या उद्देशाने जिल्हा परिषद सेस निधीतुन रु.५० लक्ष निधी हा सुक्ष्म अन्न प्रक्रिया विशेष योजनेमधून उपलब्ध करुन दिला आहे. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते प्रतिनिधीक स्वरूपात जळगाव तालुक्यातील बिलवाडी येथील रघुवीर समर्थ महिला शेतकरी गटाच्या सदस्यांना पापड व डाळ उद्योग करीता पुर्व संमती देण्यात आली.

यावेळी जिल्हाधिकारी आयुषप्रसाद , मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक राजू लोखंडे, कृषी विकास अधिकारी पद्मनाभ म्हस्के हे उपस्थित होते.

### जि. प.तर्फे २५ बचत गटांना ५० लाख निधी

महिला बचत गटात काम करणाऱ्या महिलांना बचत गटाच्या माध्यमातुन रोजगार उपलब्ध व्हावा व महिला आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण आणि सक्षम व्हाव्यात यासाठी जिल्हा परिषदेमार्फत ही योजना आखण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या स्वउत्पन्नाच्या निधीतून २५ बचत गटांना ५० लाख रुपये इतक्या निधीच्या माध्यमातून अन्न प्रक्रिया उद्योगासाठी आवश्यक असलेले पापड मशीन, डाळ मिल, लाकडी तेलघाणा यासह इतर पूरक साधने पुरविण्यात येणार आहेत. या सोबतच जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना अधिक कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने रु. ५५ लक्ष हे शेतकरी उत्पादक कंपनीसाठी ड्रोन खरेदी करता उपलब्ध केले आहेत. जिवामृत स्लरी फिल्टर करीता रु.१२ लक्ष दिले आहेत.

जळगांव जिल्हा परिषदेच्या कृषी विभागातर्फे बचत गटाच्या महिलांना अन्न प्रक्रिया उद्योगासाठी पालकमंत्र्यांच्या हस्ते आज दि. २ मे रोजी पूर्व संमती प्रमाणपत्र वितरित करण्यात आले. यावेळी बिलवाडी येथील बचत गटाच्या महिलांसह सीईओ मीनल करनवाल उपस्थित होत्या. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून जिल्हा परिषदेच्या कृषि विभागाने ग्रामिण शेतकरी महिलांना

आर्थिक स्वावलंबन व रोजगार निर्मितीच्या उद्देशाने जिल्हा परिषद सेस निधीतून रु.५० लाखांचा निधी हा सूक्ष्म अन्न प्रक्रिया विशेष योजनेमधून उपलब्ध करुन दिला आहे. १ मे या महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने काल जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात बिलवाडी (ता. जळगाव) येथील रघुवीर समर्थ महिला शेतकरी गटाच्या सदस्यांना पापड व डाळ उद्योगाकरीता पूर्व संमती देण्यात आली.

महिलांना बचत गटाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध व्हावा व महिला आर्थिक दष्टया स्वयंपर्ण आणि सक्षम व्हाव्यात, यासाठी जिल्हा परिषदेमार्फत ही योजना आखण्यात आली आहे. जिल्हा परिषदेच्या स्व उत्पन्नाच्या निधीतून २५ बचत गटांना ५० लाख रुपये इतक्या निधीच्या माध्यमातून अन्न प्रक्रिया उद्योगासाठी आवश्यक असलेले पापड मशीन, डाळमिल, लाकडी तेलघाणा यासह इतर पूरक साधने पुरविण्यात येणार आहेत. यासोबतच जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाकडुन शेतकऱ्यांना अधिक कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने रु. ५५ लक्ष हे शेतकरी उत्पादक कंपनीसाठी ड्रोन खरेदी करता उपलब्ध केले आहेत. तर जिवामृत स्लरी फिल्टरकरीता रु.१२ लक्ष उपलब्ध करून दिले आहेत.

# खोडा शेड

जिल्ह्यातील ग्रामीण भागात असलेल्या पशुधनाला योग्य पद्धतीने जिल्हा परिषदेंतर्गत येणाऱ्या पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या माध्यमातून उपचार करता यावे या साठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून १५२ पशुवैद्यकीय दवाखान्यापैकी ३३ दवाखान्यांमध्ये खोडा शेड उभारण्यात येणार आहे. या साठी जिल्हा परिषदेच्या स्व निधीतून ४९ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

जिल्ह्याभरातील ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असलेल्या पशुधनाची काळजी घेण्यासोबतच त्यांच्यावर वेळीच उपचार करता यावे या साठी जळगाव जिल्ह्यात एकुण १५२ पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. या दवाखान्यात उपचारासाठी येणारे पशुधनाचे उन्ह ,वारा , पाऊस याचे पासून सरक्षण करण्यासोबतच वेळेवर य योग्य पद्धतीने उपचार करता यावे या साठी मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करनवाल यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील १५२ पशुवैद्यकीय दवाखान्यांपैकी ३३ पशुवैद्यकीय दवाखान्यांना खोडा शेड उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषदेच्या स्व निधी असलेल्या सेस फंडातून ४९ लक्ष इतकी रक्कम जिल्ह्यातील ३३ पशुवैद्यकीय दवाखान्यांना खोडा शेड उपलब्ध करून देण्यात येणार आहे . जिल्ह्यातील १५२ पशुवैद्यकीय दवाखान्यांपैकी ७८ ठिकाणी खोडा शेड उपलब्ध असून उर्वरित ७४ ठिकाणांपैकी ३३ पशुवैद्यकीय दवाखान्यांना या माध्यमातून खोडा शेड उपलब्ध होणार आहे. खोडा शेडमुळे ग्रामीण भागात पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या ठिकाणी उपचारासाठी येणाऱ्या पशुधनाची व पशुधन मालकांची गैरसोय टळणार आहे.

## जिल्ह्यात ३३ पशुवैद्यकीय दवाखान्यांत खोडा शेड

जळगाव, (वा.) जिल्ह्यातील ग्रामीण भागात असलेल्या पशुधनाला योग्य पद्धतीने जिल्हा परिषदेंतर्गत येणाऱ्या पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या माध्यमातून उपचार करता यावे या साठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून १५२ पशुवैद्यकीय दवाखान्यापैकी ३३ दवाखान्यांमध्ये खोडा शेड उभारण्यात येणार आहे. या साठी जिल्हा परिषदेच्या स्व निधीतून ४९ लक्ष इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

जिल्ह्याभरातील ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचा मुख्य कणा असलेल्या पशुधनाची काळजी घेण्यासोबतच त्यांच्यावर वेळीच उपचार करता यावे या साठी जळगाव जिल्ह्यात एकूण १५२ पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. या दवाखान्यात उपचारासाठी येणारे पशुधनाचे उन्ह ,वारा , पाऊस याचे पासून सरंक्षण करण्यासोबतच वेळेवर य योग्य पद्धतीने उपचार करता यावे या साठी मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या पुढाकाराने जिल्ह्यातील १५२ पशुवैद्यकीय दवाखान्यांपैकी ३३ पशुवैद्यकीय दवाखान्यांना खोडा शेड उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

### पशुधन मालकांची गैरसोय टळणार...

जिल्ह्यातील १५२ पशुवैद्यकीय दवाखान्यांपैकी ७८ ठिकाणी खोडा शेड उपलब्ध असून उर्वरित ७४ ठिकाणांपैकी ३३ पशुवैद्यकीय दवाखान्यांना या माध्यमातून खोडा शेड उपलब्ध होणार आहे.खोडा शेडमुळे ग्रामीण भागात पशुवैद्यकीय दवाखान्याच्या ठिकाणी उपचारासाठी येणाऱ्या पशुधनाची व पशुधन मालकांची गैरसोय टळणार आहे.

# सक्षमीकरणाचे नवे पर्व

तालुकास्तरावर महिला बचत गटांच्या वस्तू विक्रीसाठी शासकीय पातळीवर जागा उपलब्ध करून दिली जाईल. गरज भासल्यास नवीन जागा विकसित करण्यातही शासन मदत करेल. सक्षमीकरण, उद्यमशीलता व उत्पन्नवाढ यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल. ग्रामसंघ, प्रभागसंघ यांच्याकडून येणाऱ्या समस्या व सूचना शासन गांभीर्याने घेईल." असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी केले. उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद जळगाव अंतर्गत नारीशक्ती महिला प्रभाग संघ, नेरी दिगर व पळासखेडा (प्र.न.) यांच्या वतीने आयोजित वार्षिक सर्वसाधारण सभा व राष्ट्रीय ग्रामस्वराज्य अभियानाच्या आर्थिक विकास व उत्पन्नवाढ घटकांतर्गत सोलर ड्रायिंग प्रकल्पाचे भूमिपूजन सोहळा पळासखेडा बु. (ता. जामनेर) येथे त्यांच्या हस्ते झाला.

यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक राजू लोखंडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब अकलाडे, सहाय्यक गटविकास अधिकारी कैलास काळे, सरपंच भिका तायडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सीईओ मीनल करनवाल यांनी या कार्यक्रमामागची भूमिका केली. कार्यक्रमात समृद्ध पंचायतराज अभियान, घरकुल ग्रामस्पर्धा २०२५-२६, मुक्ताई स्वच्छ ग्राम अभियान, मिनी एटीएम व बँकिंग सुविधा केंद्राचे उद्घाटन, गरुडझेप ग्रामसंघास ट्रॅक्टरचे वितरण तसेच ३६ उत्कृष्ट महिलांचा सन्मान करण्यात आला. ज्ञानेश्वर बाविस्कर यांनी आभार मानले. नेरी दिगर व पळासखेडा प्रभागातील महिला सख्या व पदाधिकारी यांनी घेतलेल्या परिश्रमातून कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडल्याचे ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक राजू लोखंडे यांनी सांगितले.



## केळीच्या पहिल्या कोल्ड स्टोरेजसाठी प्रस्ताव

**● सीईओ मिनल करणवाल यांचे कृषी विभागाला आदेश**

जळगाव : जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात केळीचे उत्पादन घेतले जात असुन केळी प्रक्रिया उद्योगांसाठी बचत गटांना चालना देण्यात येत आहे. मात्र केळी उत्पादक शेतकऱ्यांना केळी साठवण्यासाठी सुविधा उपलब्ध व्हावी यासाठी नाविन्य पुर्ण योजनेतुन कोल्ड स्टोअरेज करता येईल यासाठी कृषी विभागाने प्रस्ताव तयार करण्याचे आदेश जि.पच्या सीईओ मिनल करणवाल यांनी पदमनाभ म्हस्के यांना दिले आहे.केळीसाठी कोल्ड स्टोरेज मंजुर झाल्यास हे पहिले शासकीय कोल्ड स्टोरेज ठरणार आहे.

जिल्ह्यात रावेर,यावल,चोपडा,मुक्ता ईनगर तालुक्यात मोठ्या प्रमाणात केळीचे उत्पादन घेतले जाते.जिल्ह्याची ओळख देखील 'बनाना सीटी' म्हणून केली जाते. मात्र जिल्ह्यात केळी साठवण्यासाठी उत्पादकांना कोल्ड स्टोरेजची सुविधा नाही.शेतकऱ्याना केळी साठवण्याची सविधा व्हावी यासाठी जि.पकडन आता कोल्ड स्टोरेजचा प्रस्ताव डिपीडीसीकडे देण्यात येणार असुन मंजुरीसाठी पालकमंत्रीसह जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला जाणार असल्याचे सीईओ मिनल करनवाल यांनी सांगितले.

**बचतगट,शेतकरी कंपन्याची चाचपणी**

जिल्ह्यात कोल्ड स्टोरेज शासनाच्या माध्यमातून अथवा डीपीडीसीच्या माध्यमातून मंजुर करण्यासाठी कृषी विभागाला सविस्तर प्रस्ताव तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहे. हे स्टोरेज शेतकरी कंपन्या किवा बचत गटाच्या माध्यमातन सरू करता येईल का? याबाबत देखील चाचपणी केली जाणार आहे.काही शेतकरी कंपन्यांची देखील चाचपणी केली जाणार आ

जिल्ह्यात केळी उत्पादक शेतकरी व केळीचे क्षेत्र मोठे आहे. जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात बाहेर देशासह प्रदेशांमध्ये केळी पाठवली जाते .त्यामुळे केळी उत्पादकांना कोल्ड स्टोरेजची सुविधा मिळाल्यास शेतकऱ्यांना मोठा लाभ होईल.त्यामुळे केळीसाठी कोल्ड स्टोरेज करीता नाविन्य पुर्ण योजनेतुन प्रस्ताव दिला जाईल.

– **मिनल करनवाल,** सीईओ, जि.प. जळगाव

# शंभर दिवसाच्या कार्यक्रमातही जिल्हा परिषदेचा फडकला झेंडा

कार्यक्रमात १०० दिवसांच्या पाणीपुरवठा विभाग आघाडी व जळगाव, (वा.) मुख्यमंत्री १०० दिवस सुधारणा कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेचा डंका वाजला असून उपविभागीय स्तरावर उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग जळगाव, या कार्यालयाचा प्रथम क्रमांक आला असून दवितीय स्थानी पशुधन विकास अधिकारी विवरे ता. रावेर तर तृतीय क्रमांक तालुका वैदयकीय अधिकारी रावेर या कार्यालयानी पटकावला आहे.

१०० दिवस सुधारणा कार्यक्रमांतर्गत करावयाच्या कामांबाबत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी सातत्याने मार्गदर्शन करून आढावा घेत जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या विविध कार्यालयांना सुधारणा कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्याबाबत सूचना केल्या होत्या. त्याअनुषंगाने कार्यालयीन सुधारणा, स्वच्छता, तक्रार निवारण, सुलभजीवनमान तसेच तंत्रज्ञानाचा वापर करून आवश्यक त्या सुविधा व उपाययोजना करणेबाबत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल

उपविभाग स्तरावर या तिन्ही कार्यालयांचा क्रमांक आला आहे. या तिन्ही कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या कामगिरीबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी अभिनंदन केले आहे. मुख्यमंत्री १०० दिवसांच्या कार्यक्रमात जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांना कामाचे उद्दीष्ट देण्यात आले होते. त्यात जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने उपविभागीय स्तरावर अव्वल स्थान पटकाविले तर दुसऱ्या क्रमांकावर रावेर तालुक्यातील पशुधन विभागाने बाजी मारली आहे.

## १०० दिवसांच्या कार्यक्रमात पाणीपुरवठा विभाग आघाडीवर



जळगाव, (वा.) मुख्यमंत्री १०० दिवस सुधारणा कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेचा डंका वाजला असून उपविभागीय स्तरावर उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग जळगाव, या कार्यालयाचा प्रथम क्रमांक आला असून द्वितीय स्थानी पशुधन विकास अधिकारी विवरे ता.रावेर तर तृतीय क्रमांक तालुका वैद्यकीय अधिकारी रावेर या कार्यालयानी पटकावला आहे.

१०० दिवस सुधारणा कार्यक्रमांतर्गत करावयाच्या कामांबाबत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी सातत्याने मार्गदर्शन करून आढावा घेत जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या विविध कार्यालयांना सुधारणा कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्याबाबत सूचना केल्या होत्या.त्याअनुषंगाने कार्यालयीन सुधारणा, स्वच्छता, तक्रार निवारण, सुलभ जीवनमान तसेच तंत्रज्ञानाचा वापर करून आवश्यक त्या सुविधा व उपाययोजना करणेबाबत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल उपविभाग स्तरावर या तिन्ही कार्यालयांचा क्रमांक आला आहे. या तिन्ही कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या कामगिरीबद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी अभिनंदन केले आहे. मुख्यमंत्री १०० दिवसांच्या कार्यक्रमात जिल्ह्यातील विविध शासकीय विभागांना कामाचे उद्दीष्ट देण्यात आले होते. त्यात जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाने उपविभागीय स्तरावर अव्वल स्थान पटकाविले तर दुसऱ्या क्रमांकावर रावेर तालुक्यातील पशुधन विभागाने बाजी मारली आहे.

## ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग कार्यालयाचा प्रथम क्रमांक

न्यूज डेस्क | जळगांव

मुख्यमंत्री १०० दिवस सुधारणा कार्यक्रमांतर्गत जिल्हा परिषदेचा डंका वाजला असून उपविगागीय स्तरावर उप अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग जळगाव, या कार्यालयाचा प्रथम क्रमांक आला असून द्वितीय स्थानी पशुधन विकास अधिकारी विवरे ता. रावेर तर तृतीय क्रमांक तालुका वैद्यकीय अधिकारी रावेर या कार्यालयानी पटकावला आहे. १०० दिवस सुधारणा कार्यक्रमांतर्गत करावयाच्या कामांबाबत जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांनी सातत्याने मार्गदर्शन करून आढावा घेत जिल्हा परिषदेच्या अंतर्गत येणाऱ्या विविध कार्यालयांना सुधारणा कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्या बाबत सूचना केल्या होत्या.त्या अनुषंगाने कार्यालयीन सुधारणा, स्वच्छता,



तक्रार निवारण,सुलभ जीवनमान तसेच तंत्रज्ञानाचा वापर करून आवश्यक त्या सुविधा व उपाययोजना करणे बाबत उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल उपविभाग स्तरावर या तिन्ही कार्यालयांचा क्रमांक आला आहे. या तिन्ही कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी केलेल्या कामगिरी बद्दल मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिनल करनवाल यांनी अभिनंदन केले आहे.

# आरोग्य यंत्रणेच्या सक्षमीकरणास बळकटी

स्वच्छता हा एकुणातच कळीचा मुद्दा आहे, पण किमान आरोग्य केंद्रे, देवालये आणि शालेय परिसरांतूनही अस्वच्छता कशी सहन केली जाते, याचे मला नवल वाटते, अशी कानउघडणी जि. प. सीईओ मीनल करनवाल यांनी केलीच, त्यासह एका गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील अस्वच्छतेवरून तेथील सफाई कामगाराचे एका दिवसाचे वेतन रोखण्याचे आदेशही दिले. स्वच्छता हा एकुणातच कळीचा मुद्दा आहे, पण किमान आरोग्य केंद्रे, देवालये आणि शालेय परिसरांतूनही अस्वच्छता कशी सहन केली जाते, याचे मला नवल वाटते, अशी कानउघडणी जि. प. सीईओ मीनल करनवाल यांनी केली. त्यासह एका गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील अस्वच्छतेवरून तेथील सफाई कामगाराचे एका दिवसाचे वेतन रोखण्याचे आदेशही दिले. श्रीमती करनवाल यांनी जि. प. अंतर्गत येणाऱ्या जिल्हाभरातील विविध आस्थापनांना भेटी देण्याचा धडाका सुरू केला आहे. बुधवारी १६ एप्रिल रोजी जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील वरखेडी प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामपंचायतीना भेट दिली असता प्राथमिक आरोग्य केंद्रात अस्वच्छता आढळून आल्याने त्यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. औषध साठा सीईओ करनवाल यांनी तपासला. रुग्णांवर करण्यात येत असलेले उपचार पाहिले. केंद्र परिसरातील अस्वच्छतेबाबत तेथील सफाई कामगारास बोलवून घेतले. वैयक्तिक आरोग्यात डॉक्टरांची जशी भूमिका असते, तशीच सार्वजनिक आरोग्यात तुमचीही भूमिका असते, असे समजावून सांगितले. पिंपळगाव हरेश्वर येथे सुरू असलेल्या घरकुल बांधकामांसह ग्राम पंचायत कार्यालयास भेट देऊन सीईओ करनवाल यांनी पाहणी केली.



## योजना गावपातळीवर खरंच न्यायची, तर तळागाळात प्रत्यक्ष जावेच लागते!

### झेडपी सीईओ मीनल करनवाल यांचा दावा; 'स्वच्छता हा स्वभाव व्हावा'

न्यूज डेस्क | जळगाव

**शासन लोककल्याणकारी योजना जाहीर करते. प्रशासन म्हणून आम्ही या योजनांची अंमलबजावणी करतो. आम्ही योजनांचे वाचन कितीही केले, योजनेसंदर्भातली कितीही प्रेझेन्टेशन्स पाहिली, कितीही प्रात्यक्षिके पाहिली वा केली, तरीही योजनेचा परिणाम साधायचा तर गावपातळीवर, तळागाळात प्रत्यक्ष गेल्याशिवाय गत्यंतर नसते, हे मी अनुभवावरून सांगते, असा दावा जळगाव जिल्हा परिषदेच्या सीईओ मीनल करनवाल यांनी केला.**

ग्रामगौरव चमूने जिल्हा परिषदेतील सीईओ दालनाला भेट दिली असता ग्रामीण विकास या विषयाचे विविध पैलू मीनल करनवाल यांनी उलगडले. ग्रामीण विकासाशी निगडित सारेच विषय पहावे लागतात, पण एक व्यक्ती म्हणूनही आणि अधिकारी म्हणूनही ग्रामस्वच्छता हा माझ्या विशेष जिव्हाळ्याचा विषय आहे. कदाचित माझी मुळे देवभूमी उत्तराखंडातील असल्याने स्वच्छतेचा हा संस्कार माझ्यात खोलवर रुजलेला असावा. माझे गृहराज्य हे मंदिरांचे राज्य आहे. डोंगराळ भाग आहे. जागोजागी मंदिरे आहेत. त्यामुळे बहुदा स्वच्छता हा लोकांचा स्वभाव बनलेला असावा, अशी संवादाची सुरुवात त्यांनी केली. वरखेडी (पाचोरा) येथील प्राथमिक आरोग्य केंद्राला करनवाल यांनी अशातच भेट देऊन तपासणी केली. केंद्राचा परिसर अस्वच्छ आढळून आला. आरोग्य केंद्रच अस्वच्छ असेल तर मग उर्वरित गावाचे काय... कारवाई म्हणून करनवाल यांनी केंद्रातील संबंधित कर्मचाऱ्याचे एक दिवसाचे वेतन कापले. यावर त्या म्हणाल्या, ही कारवाई प्रतीकात्मक आहे. ती करताना काही आनंद झालेला नाही.

एकाला ठोकर, दुसरा शहाणा... या न्यायाने जिल्ह्यात सर्वत्र मेसेज जाईल... आणि आरोग्य केंद्रे तरी स्वच्छ राखली जातील... स्वच्छतेसाठी सर्वसामान्य नागरिकांमध्येही जागरूकता आपण आणतोच आहोत. याउपर स्वच्छतेसाठी जबाबदार असलेले आणि शासनाच्या आकृतिबंधातील घटकच उदासीन असतील, तर नुसती रिफॉर्मेटिव्ह थिअरी (सुधारणात्मक उपाय) राबवून चालणार नाही, डिटरंट (शिक्षेचा धाक) थिअरी आजमावीच लागेल. प्राथमिक पातळीवर आरोग्य केंद्रांसह शाळा आणि धार्मिक स्थळांचे परिसर तरी लोकांनी स्वच्छ ठेवावेत, यावर माझा भर आहे. स्वच्छतेचे हे वर्तुळ मग टप्प्याटप्प्याने वाढवत नेऊयात, असे मीनल करनवाल म्हणाल्या. रोहयो कर्मचारी, मुक्ताई माता अभियान, प्लास्टिकमुक्त जत्रा, बालिका पंचायती, जल पुनर्भरण (रेन वॉटर हार्वेस्टिंग), बालआरोग्य, सार्वजनिक आरोग्य आदी अनेकविध विषयांवर मीनल करनवाल यांनी विस्तृत चर्चा केली.

जळगाव : जिल्हा परिषद सीईओ मीनल करनवाल यांचा वह्यांचा संच देऊन सत्कार करताना ग्रामगौरवचे संपादक विवेक ठाकरे. सोबत धनश्री ठाकरे.

### फुले कोमेजतील, ज्ञान फुलत राहील

जि. प. सीईओ मीनल करनवाल या सत्कारात बुके (पुष्पगुच्छ) स्वीकारत नाहीत. बुके ज्या किमतीत येतो, त्या किमतीचे शालेय साहित्य मला द्या, मी ग्रामीण भागातील गरिब-गरजू विद्यार्थी-विद्यार्थिनींपर्यंत हे साहित्य पोहोचवले. तुम्ही मला दिलेली फुले एकवेळ कोमेजतील, पण शालेय साहित्य जर मला दिलेत तर या बळावर देशाच्या भावी पिढीत उमलणारे ज्ञानपुष्प सदैव टवटवीत राहील, अशी यामागील भूमिकाही त्या सांगतात. त्यांच्या या भूमिकेचा गौरव म्हणून ग्रामगौरवतर्फे त्यांना बुकेऐवजी वह्यांचा संच भेट म्हणून देण्यात आला.

विस्तृत मुलाखत ग्रामगौरव मासिकात लवकरच.....

मासिक ग्रामगौरव

प्रतिबिंब महाराष्ट्राचे, ग्रामीण विकासाचे !

Gramgaurav Digital Jalgaon Edition
Apr 18, 2025 Page No. 1
Powered by: erelego.com



## आरोग्य केंद्रात स्वच्छता हवीच - मीनल करनवाल

### जि.प. सीईओंनी वरखेडीत संबंधिताचे एक दिवसाचे वेतन कापले

न्यूज डेस्क | जळगाव

**स्वच्छता हा एकुणातच कळीचा मुद्दा आहे, पण किमान आरोग्य केंद्रे, देवालये आणि शालेय परिसरांतूनही अस्वच्छता कशी सहन केली जाते, याचे मला नवल वाटते, अशी कानउघडणी जि. प. सीईओ मीनल करनवाल यांनी केलीच, त्यासह एका गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील अस्वच्छतेवरून तेथील सफाई कामगाराचे एका दिवसाचे वेतन रोखण्याचे आदेशही दिले.**

स्वच्छता हा एकुणातच कळीचा मुद्दा आहे, पण किमान आरोग्य केंद्रे, देवालये आणि शालेय परिसरांतूनही अस्वच्छता कशी सहन केली जाते, याचे मला नवल वाटते, अशी कानउघडणी जि. प. सीईओ मीनल करनवाल यांनी केलीच, त्यासह एका गावातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील अस्वच्छतेवरून तेथील सफाई कामगाराचे एका दिवसाचे वेतन रोखण्याचे आदेशही दिले.

श्रीमती करनवाल यांनी जि. प. अंतर्गत येणाऱ्या जिल्हाभरातील विविध आस्थापनांना भेटी देण्याचा धडाका सुरू केला आहे. बुधवारी १६ एप्रिल रोजी जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील वरखेडी प्राथमिक आरोग्य केंद्र व ग्रामपंचायतीना भेट दिली असता प्राथमिक आरोग्य केंद्रात अस्वच्छता आढळून आल्याने त्यांनी तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. औषध साठा सीईओ करनवाल यांनी तपासला. रुग्णांवर करण्यात येत असलेले उपचार पाहिले. केंद्र परिसरातील अस्वच्छतेबाबत तेथील सफाई कामगारास बोलवून घेतले. वैयक्तिक आरोग्यात डॉक्टरांची जशी भूमिका असते, तशीच सार्वजनिक आरोग्यात तुमचीही भूमिका असते, असे समजावून सांगितले. पिंपळगाव हरेश्वर येथे सुरू असलेल्या घरकुल बांधकामांसह ग्राम पंचायत कार्यालयास भेट देऊन सीईओ करनवाल यांनी पाहणी केली.

# पोषण आहारावरही थेट नजर

जिल्हा परिषदेच्या जळगाव जिल्ह्यातील एकूण १८०० शाळांमध्ये देण्यात येणाऱ्या मध्यान्ह भोजनाच्या गुणवत्तेवर आणि नियमिततेवर थेट मुख्य कार्यकारी अधिकारी मा. मिनल करनवाल लक्ष ठेवणार आहेत.शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, शाळांमध्ये मध्यान्ह भोजन ठरवून दिलेल्या प्रती प्रमाणे व मेनू अनुसारच दिले जाणे आवश्यक आहे. याच्या अंमलबजावणीसाठी एक अभिनव पाऊल उचलत, जिल्ह्यातील सर्व शाळांसाठी व्हॉट्सअॅप ग्रुपच्या माध्यमातून दररोज मध्यान्ह भोजनाचे जिओ-टॅगिंगसह फोटो पाठविणे बंधनकारक करण्यात आले आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्पष्ट निर्देश दिले आहेत की, जे मुख्याध्यापक दररोजचे फोटो अपलोड करणार नाहीत, त्यांच्या विरोधात कारवाई करण्यात येईल. या उपक्रमाच्या माध्यमातून मध्यान्ह भोजन वितरणात पारदर्शकता, शिस्त आणि गुणवत्तेची खातरजमा होणार आहे.दरम्यान जिल्ह्यातील प्रत्येक तालुका पोषण आहार अधीक्षक यांनी ग्रुप वर आलेल्या मध्यान्न भोजनाच्या छायाचित्रांचे मोजणी करून रेकॉर्ड ठेवायचे आहे. त्या सोबतच मध्यान्न भोजनासाठी दिले जाणारे पदार्थ दिसतील अशा पद्धतीनेच छायाचित्र काढण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत. हा उपक्रम शालेय शिक्षणात पोषण सुरक्षा सुनिश्चित करणारा ठरेल, तसेच विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

## विद्यार्थ्यांमध्ये मिसळून पोषण आहाराची घेतली चव

**जळगाव** : जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी मंगळवारी भुसावळ तालुक्यातील किन्ही आणि साकरी गावांना अचानक भेट देत जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत जाऊन तेथील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी मीनल करनवाल यांनी विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शालेय पोषण आहाराची चव चाखली. यावेळी त्यांच्यासमवेत भुसावळ गटविकास अधिकारी सचिन पानझडे उपस्थित होते.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी भुसावळ तालुक्यातील किन्ही आणि साकरी या गावांना भेटी दिल्या. याप्रसंगी त्या

### जि.प. सीईओंची शाळांना अचानक भेट



अचानक जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत जाऊन

विद्यार्थ्यांमध्ये जमिनीवर बसून विद्यार्थ्यांमध्ये मिसळत शालेय पोषण आहाराची चव चाखत त्यांच्याशी संवाद साधला. पोषण आहाराबाबत समाधान व्यक्त करत शिक्षकांशी बोलतांना जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांचे शैक्षणिक गुणवत्ता वाढली पाहिजे व दर्जा देखील उंचावला पाहिजे. या दृष्टीने शिक्षकांनी प्रयत्न करण्यासोबत विविध उपक्रम राबवण्याबाबत देखील त्यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले. नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी करनवाल किन्ही व साकरी या गावातील ग्रामपंचायत कार्यालयाची पाहणी केली. शासनाच्या विविध योजनांचा आढावा घेत त्याबाबत सुरू असलेल्या अंमलबजावणी संदर्भातले आढावा घेतला. त्यासोबतच दोन्ही ठिकाणच्या प्राथमिक शाळा तसेच गावात सुरू असलेल्या घरकुल बांधकामांना भेट देऊन पाहणी केली.

**INSPECTION** | **ZP CEO also tasted mid-day meal with students at Kinhi and Sakri**

## Karanwal visits Bhusawal taluka

**Vijay Pathak**
JALGAON

Zilla Parishad Chief Executive Officer Minal Karanwal paid a surprise visit to Kinhi and Sakri villages in Bhusawal taluka on Tuesday, where she interacted with students at Zilla Parishad primary schools and tasted the nutritious mid-day meal provided to them.

Accompanied by Bhusawal's Block Development Officer Sachin Panzhade, Karanwal sat on the ground with the students, engaged with them, and personally checked the quality of the food being served. Expressing satisfaction, she encouraged the staff to continue maintaining nutrition standards.

During her interaction with teachers, Karanwal offered guidance on implementing various activities to improve the quality of education in the Zilla Parishad's primary schools. She stressed the importance of enhancing teaching methods and student engagement.

After the school visit, Karanwal inspected the Gram Panchayat offices in both Kinhi and Sakri. She conducted a review of various government schemes under implementation and examined the progress of ongoing development works.

The CEO also inspected ongoing housing construction projects in the villages, along with the functioning of the primary schools. Her visit was aimed at ensuring effective delivery of services, monitoring grassroots-level schemes, and promoting educational improvements in rural areas.




**Karanwal also inspected Gram Panchayat offices in both Kinhi and Sakri, and reviewed various government schemes**

# फ्री डायबेटिक तपासणी मोहीम

बदलती जीवनशैली आहार विहाराचे प्रमाण यामुळे दिवसेंदिवस आरोग्यावर होणारा परिणाम याबाबतची माहिती जाणून घेण्यासाठी जळगाव जिल्हा परिषदेच्या माध्यमातून प्रायोगिक तत्त्वावर धरणगाव तालुक्यातील पिंपरी येथील प्राथमिक प्राथमिक शाळेतील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांच्या रक्ताच्या नमुन्यांची तपासणी करण्यात आली असता यात जवळपास 55 ते 60 बालकांना मधुमेहाची लक्षणे आढळून आली होती.

त्या पार्श्वभूमीवर मुंबई येथील विल ग्लोबल फाउंडेशन या संस्थेशी जिल्हा परिषदेने करार करून या पुढच्या काळात आहार आणि आरोग्य संदर्भात जनजागृती करण्यात येणार आहे अशी माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीनल करनवाल यांनी बुधवार दिनांक 30 एप्रिल रोजी माध्यम प्रतिनिधींशी बोलताना दिली आहाराचे बदलणारे प्रमाण दिवसेंदिवस बदलत असलेली जीवनशैली सोबतच आहारातील जंक फूडचे प्रमाण याचा परिणाम आरोग्यावर मोठ्या प्रमाणात होत आहे ही बाब मोठी समस्या बनली असली तरी बालकांच्या आरोग्यावर होणारे परिणाम रोखण्याच्या दृष्टिकोनातून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मीनल करनवाल यांच्या संकल्पनेतून प्रायोगिक तत्त्वावर जिल्ह्यातील एका शाळेची निवड करून तेथील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांची रक्ताच्या नमुन्यांची तपासणी करण्यात आली

या तपासणी दरम्यान मोठ्या प्रमाणात बालके ही मधुमेहाची लागण होण्याच्या उंबरठ्यावर असल्याचे दिसून आले प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आलेल्या तपासणीतून निघालेला निष्कर्ष बघता जिल्हाभरात आहार आणि आरोग्य संदर्भात जनजागृती करण्याची आवश्यकता असल्याचे पुढे आल्यानंतर जळगाव जिल्हा परिषदेने वील फाउंडेशन या संस्थेसोबत करार करून जिल्हाभरात शाळा आणि नागरिकांमध्ये आहार आणि आरोग्य संदर्भात जनजागृती साठी विशेष मोहीम हाती घेण्यात येणार आहे त्यासोबतच या पुढील काळात शाळा सुरू झाल्यानंतर जिल्हा परिषदेचे आरोग्य विभागामार्फत प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर विद्यार्थ्यांच्या रक्ताची तपासणी करण्याची मोहीम देखील सुरू करण्यात येणार असल्याची माहिती श्रीमती करनवाल यांनी यावेळी दिली.



**Check-up finds 71 Pimpri school students pre-diabetic**

Vijay Pathak
JALGAON

As many as 71 students from a school in Pimpri in Dharangaon taluka have been found to be pre-diabetic during a recent health check-up, Zilla Parishad Chief Executive Officer Minal Karanwal said on Thursday.

The health examination covered 242 students from classes 1 to 4 of the local primary and girls' school in Pimpri. Of them, 71 students were diagnosed as pre-diabetic. Karanwal said the figure is alarming from a public health perspective and warrants immediate action. "In view of these shocking results, similar health check-ups will now be conducted in all schools falling under the jurisdiction of primary health centres across the district," she told reporters.

**Health check-up covered 242 students from classes 1 to 4 of the local primary and girls' school**

The expanded screening campaign will be carried out through a partnership with the Wills Global Foundation, she added.

Stressing the importance of dietary changes, Karanwal urged parents to avoid feeding children junk food and instead focus on chapatis, bakris and fibre-rich meals. "There is a need to keep children away from junk food. For that, their diet must be changed, and awareness will have to be created," she said. "Parents will be made aware of the importance of providing traditional and nutritious foods at home. I believe that if the diet is changed, these pre-diabetic students will definitely come out of this crisis," she added.

She pointed to successful outcomes in the Nandurbar district, where awareness initiatives on dietary changes were effectively implemented. "We have seen good results in Nandurbar. After spreading awareness there, we ensured effective implementation and observed significant improvement," she said.



देशदूत
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
01 May 2025 · Page 6

**आरोग्य तपासणीत पिंप्रीतील**
**71 विद्यार्थी प्री-डायबेटिक**

**जूनपासून आरोग्य केंद्र क्षेत्रातील शाळांमध्ये होणार तपासणी**

जळगाव । प्रतिनिधी

# नो शुगर बोर्ड अभियान

विद्यार्थ्यांमध्ये साखरेच्या अतिसेवनाबाबत जनजागृतीसाठी जिल्हा परिषद जळगावचा “नो शुगर” उपक्रम : शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेल्या साखरयुक्त पेय व पदार्थांच्या सेवनामुळे उद्भवणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांची दखल घेऊन जिल्हा परिषद, जळगाव यांनी एक अभिनव व जनजागृतीपर उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे.

सद्यस्थितीत जिल्हा परिषदेच्या 1800 शाळा व 78 प्राथमिक आरोग्य केंद्रात साखरेचे फलक लावण्यात आले आहे

मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये “नो शुगर” फलक लावण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. या फलकांमध्ये विविध शीतपेयांमधील ॲडेड शुगरचे प्रमाण स्पष्टपणे दर्शविण्यात आले असून विद्यार्थ्यांना प्रक्रिया केलेल्या साखरेचे दुष्परिणाम समजावून सांगितले जात आहेत.

या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, प्रक्रिया केलेल्या साखरेपासून होणारे धोके पटवून देणे तसेच निरोगी जीवनशैलीकडे विद्यार्थ्यांना प्रेरित करणे हा आहे.साखरेचे अतिसेवन टाळल्यास मधुमेह, वजनवाढ यांसारख्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल.

शाळेच्या पातळीवरच विद्यार्थ्यांमध्ये योग्य आहारशिक्षणाची जाणीव निर्माण करण्यासाठी “नो शुगर” उपक्रम प्रभावी ठरणार आहे.जिल्हा परिषदेचा हा उपक्रम आरोग्यदृष्ट्या फायदेशीर, शाळांमध्ये वापरयोग्य आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी दीर्घकालीन परिणामकारक ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

**1800 शाळा व 78 प्राथमिक आरोग्य केंद्रात झळकले फलक**



## जि. प. प्रशासनाचा ‘नो शुगर’ उपक्रम

### विद्यार्थ्यांमध्ये साखरेच्या अतिसेवनाबाबत केली जातेय जनजागृती

जळगाव, (वा.) शाळकरी विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेल्या साखरयुक्त पेय व पदार्थांच्या सेवनामुळे उद्भवणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांची दखल घेऊन जिल्हा परिषदेकडून एक अभिनव व जनजागृतीपर उपक्रम राबविण्यास सुरुवात केली आहे .मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद शाळा व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये "नो शुगर" फलक लावण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

या फलकांमध्ये विविध शीतपेयांमधील ॲडेड शुगरचे प्रमाण स्पष्टपणे दर्शविण्यात आले असून विद्यार्थ्यांना प्रक्रिया केलेल्या साखरेचे दुष्परिणाम समजावून सांगितले जात आहेत.या उपक्रमाचा उद्देश्य विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करणे, प्रक्रिया केलेल्या साखरेपासून होणारे धोके पटवून देणे तसेच निरोगी जीवनशैलीकडे विद्यार्थ्यांना प्रेरित करणे हा आहे. साखरेचे अतिसेवन टाळल्यास मधुमेह, वजनवाढ यांसारख्या आजारांवर नियंत्रण ठेवण्यास मदत होईल. शाळेच्या पातळीवरच विद्यार्थ्यांमध्ये योग्य आहारशिक्षणाची जाणीव निर्माण करण्यासाठी "नो शुगर" उपक्रम प्रभावी ठरणार आहे. जिल्हा परिषदेचा हा उपक्रम आरोग्यदृष्ट्या फायदेशीर, शाळांमध्ये वापरयोग्य आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी दीर्घकालीन परिणामकारक ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.



# गरोदर मातांच्या आरोग्य व सुरक्षिततेसाठी जिल्हा परिषद जळगाव आरोग्य विभागाची टोल फ्री सुविधा



## नो ॲम्ब्युलन्स, नो डॉक्टर, नो औषध

### डायल करा; जिल्हा परिषदेचा टोल फ्री नंबर

▸ **जळगाव (वा.)** गरोदर मातांना प्रसूतीसंदर्भात कोणतीही अडचण भासू नये, त्यांची प्रसूती प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा सक्षम संस्थेतच व्हावी यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून जिल्हा परिषद आरोग्य विभाग, जळगाव तर्फे टोल फ्री क्रमांक ८२ ३७ ३५३१९३ कार्यान्वित करण्यात आला आहे. या क्रमांकावर संपर्क साधून डॉक्टर, रुग्णवाहिता यांची तातडीने मदत मिळविता येणार असल्याचे जि.प.च्या आरोग्य विभागाने जाहिर केले आहे.

या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून गरोदर माता व त्यांचे कुटुंबीय त्वरित मदत मिळवू शकतात. प्रसूतीची तारीख जवळ आल्यावर रुग्णवाहिका उपलब्ध नसल्यास, .रुग्णालयात डॉक्टर उपस्थित नसल्यास, आवश्यक औषधे व उपचार उपलब्ध नसल्यासही या नंबरवर संपर्क साधता येणार आहे. सही सेवा २४ तास उपलब्ध असून गरोदर मातांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी कोणत्याही वेळी या क्रमांकावर संपर्क साधावा.या सुविधेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्याच्या विविध सुविधांचे लाभ घेणे सहज सोपे होणार आहे. एकाच क्रमांकवर आरोग्य विभागाशी संबंधित सर्व सुविधा उपलब्ध होणार असल्याने या सुविधेमुळे अनेक अडचणी सोडविणे शक्य होणार आहे.

#### गरोदर मातांना वेळेवर सेवा मिळावी यासाठी ही सुविधा

“ सप्टेंबर महिन्यात जिल्ह्यातील जवळपास २,५०० अपेक्षित प्रसूती असून गरोदर मातांची यादी आरोग्य विभागाकडून मागविण्यात आली होती. त्यापैकी सुमारे २,०१२ गरोदर मातांना थेट फोनवर संपर्क साधून विचारपूस करण्यात आली आहे. गरोदर मातांची सुरक्षित प्रसुती व योग्य आरोग्य सेवा ही जिल्हा परिषद आरोग्य विभागाची सर्वोच्च प्राधान्यक्रम आहे. त्यामुळे प्रत्येक गरोदर मातेला आवश्यक सेवा वेळेवर मिळावी यासाठी या टोल फ्री सेवेला जिल्ह्यातील नागरिकांचा सक्रिय प्रतिसाद मिळावा

– डॉ. सचिन भायेकर, जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.जळगाव

गरोदर मातांना प्रसूतीसंदर्भात कोणतीही अडचण भासू नये, त्यांची प्रसूती प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा सक्षम संस्थेतच व्हावी यासाठी ज़िल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या संकल्पनेतून जिल्हा परिषद आरोग्य विभाग, जळगाव तर्फे टोल फ्री क्रमांक **8237353193** पकार्यान्वित करण्यात आला आहे.या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून गरोदर माता व त्यांचे कुटुंबीय खालील बाबींमध्ये त्वरित मदत मिळवू शकतात:

प्रसूतीची तारीख जवळ आल्यावर रुग्णवाहिका उपलब्ध नसल्यास. रुग्णालयात डॉक्टर उपस्थित नसल्यास, आवश्यक औषधे व उपचार उपलब्ध नसल्यासही सेवा २४x७ उपलब्ध असून गरोदर मातांनी व त्यांच्या कुटुंबीयांनी कोणत्याही वेळी या क्रमांकावर संपर्क साधावा.माहे सप्टेंबर महिन्यात जिल्ह्यातील जवळपास २,५०० अपेक्षित प्रसुती गरोदर मातांची यादी आरोग्य विभागाकडून मागविण्यात आली होती. त्यापैकी सुमारे ३,०१२ गरोदर मातांना थेट फोनवर संपर्क साधून विचारपूस करण्यात आली आहे.

गरोदर मातांची सुरक्षित प्रसूती व योग्य आरोग्य सेवा ही जिल्हा परिषद आरोग्य विभागाची सर्वोच्च प्राधान्यक्रम आहे. त्यामुळे प्रत्येक गरोदर मातेला आवश्यक सेवा वेळेवर मिळावी असा हेतू आहे. या सुविधेमुळे ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्याच्या विविध सुविधांचे लाभ घेणे सहज सोपे होणार आहे. एकाच क्रमांकवर आरोग्य शी संबंधित सर्व सुविधा उपलब्ध होणार असल्याने या सुविधेमुळे अनेक अडचणी सोडविणे शक्य होणार आहे.

**३,०१२ गरोदर मातांना थेट फोनवर संपर्क**